आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

२१ डिसेंबर २०११ | वर्ष २८ | अंक १८

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०



# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक १८ । २१ डिसेंबर २०११

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठ/अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**

**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४–समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१, फोन : ०२४०–२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


## अंतरंग


अर्थात
**कृषिमूल्य आयोग बरखास्त करा**
**कृषिमूल्य आयोग : कसाबाचे कसब**
शरद जोशी ........ ३

विचार
**एफडीआयचे स्वागत हवे**
शरद जोशी ........ ७

आजकाल
**रिटेलची रिॲलिटी**
ज्ञानेश्वर शेलार ........ ८

कॉमन नॉन सेन्स
**विरोध कसला करता? जल्लोष करा!**
सुधाकर जाधव ........ १०

मुद्दा
**शेतीप्रश्नांची क्रूर थट्टा**
गिरधर पाटील ........ १२

**शेतकरी संघटना वृत्त** ........ १३


## आवाहन

शेतकरी संघटना आणि मा. शरद जोशी यांच्या संदर्भातील जुनी छायाचित्रे ज्यांच्याकडे असतील त्यांनी ती स्कॅन करून श्री. अनंत देशपांडे यांच्याकडे पाठवावीत. ही छायाचित्रे कॉम्प्युटरवती ईमेल द्वारे पाठवायची आहेत.

**ईमेल-आयडी :** haris.deshpande12@gmail.com

**संपर्क :** अनंत देशपांडे मो. ९४०३५४१८४१

# सर्व शेतकरी बांधवांना सुचित करण्यात येते की...

सर्व शेतकरी बांधवांना सुचित करण्यात येते की
यापुढे त्यांनी
स्वतःच्या जीवावर आत्महत्या कराव्यात

शासनाला जबाबदार ठरविण्याचा निर्णय
स्वतः जनतेनेच
निवडणुकीद्वारे रद्दबादल ठरविला आहे

शासकीय समित्यांवरील शासकीय विद्वानांनी
हे यापूर्वीच ओरडून सांगितलं होतं
पण शासन
कमालीचे लोकशाहीनिष्ठ असल्याकारणे
निवडणुकीद्वारे यावर त्यांनी
शिक्कामोर्तब करवून घेतले

सर्वसामान्यांचा कळवळा असणाऱ्यांनी
आपल्या पुढच्या पिढ्या
बहुमताचे कुंकू लावून सज्ज केल्या आहेत
तरी सर्व शेतकरी बांधावांना सुचित करण्यात येते की
त्यांनी आपल्या पुढच्या पिढ्या
आत्महत्येसाठी सज्ज ठेवाव्यात

# कृषिमूल्य आयोग बरखास्त करा

**तुलनात्मक किंमत सुचवणे या आयोगाच्या कुवतीबाहेरचे आहे. जडबंबाळ वाक्यरचना केली खरी, पण तिचा अर्थ काय? उदाहरणार्थ उसाचा भाव सुचवताना आयोगाने उसासाठी लागणाऱ्या सर्व वस्तूंचे भाव सुचवायचे काय? का उसापासून निर्माण होणाऱ्या इतर असंख्य वस्तूंचे भाव आयोगाने बांधून द्यायचे? का पर्यायी उत्पादनांची किंमत निश्चित करायची, साखरेच्याबरोबर वापरल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किमती ठरवायच्या? याचा उलगडा नाही. आयोगाने शहाणपणा एवढाच केला, की असल्या अनेक संभाव्य प्रश्नांना स्पर्शदेखील केला नाही, त्या भानगडीतच पडले नाहीत.**



**शरद जोशी**

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन गडकरी यांनी कृषिमूल्य आयोगाच्या बरखास्तीची मागणी नुकतीच केली. मा. शरद जोशी यांनी तबबल २५ वर्षांपूर्वीच या संदर्भात लिहिलेले दोन लेख त्या अनुषंगाने देत आहोत.

औद्योगिक विकासासाठी आवश्यक ते भांडवल शेतीमधून मिळणाऱ्या वाढव्यामधून निर्माण करण्याच्या हेतूनेच स्वातंत्र्योत्तर काळामध्ये आर्थिक धोरणे आखली गेली. या धोरणांची अंमलबजावणी इतक्या निर्दयपणे केली, की अवघ्या ३६ वर्षांतच भारताचा क्रमांक औद्योगिक प्रगत राष्ट्रांमध्ये नववा लागूनही भारत जगातला सर्वांत दरिद्री देश बनला.

ब्रिटिशांचे वसाहतवादी धोरणच या तथाकथित नव्या आर्थिक नीतीने पुढे चालू ठेवले आहे. एकीकडे शेतकऱ्यांचे शोषण साम्राज्यवादी सत्ता करीत असे, त्या धर्तीवरच चालू आहे; मात्र त्याचा लाभ शहरातल्या उद्योगांना न मिळता देशामधल्या काही विशिष्ट भागातच वाढणाऱ्या काही उद्योगांनाच मिळत आहे. मूठभर उद्योगपतींना अत्यंत स्वस्त कच्चा माल आणि देशात प्रचंड बेकारांचे थवे खेड्याकडून शहराकडे सतत वळत असल्यामुळे आणि स्वस्त अन्नधान्यामुळे अतिशय कमी रोजगारीवर उपलब्ध होणारा मजूर वर्ग सतत मिळत राहावा अशा हुशारीच्या आर्थिक क्लृप्त्या शासन यंत्रणेनेच शोधून काढल्या आहेत.

राज्ययंत्रणेचे वरील हेतू साध्य होण्यासाठी आर्थिक, महसुली, नियोजनविषयक आणि नाणेव्यवस्था सर्व हत्यारे वापरली जात आहेत. आर्थिक धोरणाचा मुख्य भर अजूनही शेतीमालाचे दर शेतीच्या प्रत्यक्ष उत्पादनखर्चापेक्षा कमी ठेवण्यावरच आहे.

न पडणाऱ्या भावाने तुटीच्या काळात लेव्ही पद्धतीने सक्तीची वसुली, मुबलकतेच्या काळात शेतकऱ्याला अगदी अपुरे आधारभाव अवास्तव किमतीवर शेतीमालाची आयात (पी. एल. ४८० कराराने आलेले धान्य, दूध, भुकटी, लोणी, खाद्यतेल) परदेशी शेतीमालाने देशी बाजारपेठा भरून टाकून किमती पाडणे, अतिरिक्त शेतीमालाच्या निर्यातीवर कठोर नियंत्रण किंवा निर्यातविषयक धोरणातील पद्धतशीर धरसोड, आंतरराष्ट्रीय मूल्य भरमसाट पातळीवर ठरविणे इ. अनेक मार्गांनी शेतीव्यवसाय तोट्यात राहील अशी व्यवस्था केली जाते.

शेतीमालाचे दर शास्त्रीय तत्त्वावार निर्धारित करण्यासाठी १९६५ च्या जानेवारी महिन्यात कृषिमूल्य आयोगाची स्थापना झाली. गेल्या १८ वर्षांत या आयोगाची अधोगती शेतकऱ्यांचे शोषण करण्याच्या एका प्रमुख षड्यंत्रामध्ये झाली आहे.

शेतीचा गळा घोटण्याचेच सरकारचे धोरण असल्यामुळे एका लहानशा आयोगाचे त्यापुढे काही चालू नये हे स्वाभाविकच आहे. कृषिमूल्य आयोगाची कार्यपद्धती काहीही असो, ती शास्त्रीय निश्चितच नाही. कृषिमंत्रालयाच्या पातळीवरील किमती केवळ राजकिय सौदेबाजीनेच ठरतात. सुगीनंतरच्या खुल्या बाजारातल्या भावापेक्षा कमी भाव सामान्यपणे ठरवण्यात येतात आणि शेतकऱ्यांच्या साहाय्यासाठी सरकारी यंत्रणा कठीण वेळी पुढे येत नाही. त्यामुळे कृषिमूल्य आयोगाने निर्धारीत केलेले दर केवळ शेतीमालाचे भाव जास्तीत जास्त काढेपर्यंत चढू दिले जावेत याबद्दल व्यापाऱ्यांना मिळालेला इशाराच असतो. त्यांना प्रत्यक्ष फारसे महत्त्व नसतेच. अशा कृषिमूल्य आयोगामुळे शेतकऱ्याच्या डोळ्यात धूळफेक करून सरकारची शेतकरीद्रोही धोरणे दडवणे शासन यंत्रणेला सुलभ होते. एवढाच त्याचा उपयोग. हा असला कृषिमूल्य आयोग मोडीत काढून नव्या आयोगाची निर्मिती या आधीच करायला हवी होती.

सध्याच्या कृषिमूल्य आयोग, निरूपयोगी ठरावा अशी योजना त्याच्या जन्मदात्यानीच करून ठेवल्यामुळे तसे झाले. आयोगाच्या सनदेत त्याचे स्वरूप आणि कार्यपद्धती अशा प्रकारे ठरवली गेली, की अनेक न झेपणाऱ्या जबाबदाऱ्या त्यावर लादण्यात आल्या.

कृषिमूल्य आयोगाने, ''शेती उत्पादनांच्या मूल्यविषयक धोरणाबद्दल सल्ला द्यावा, अशी अपेक्षा आहे;'' मात्र शेतीमालाच्या किंवा संबंधित वस्तूंच्या किमती सुचवताना आयोगाने इतर अनेक घटकांचाही विचार केला पाहिजे. उदा. देशातील जमीन आणि अन्य उत्पादक घटकांचा यथायोग्य वापर, शेतीमालाच्या किमतीचा बाकीच्या अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम, विशेषतः सर्वसाधारण राहणीमान, मजुरीचे दर आणि औद्योगिक किमतीवर होणारा परिणाम इत्यादी.

हा खटाटोप कशासाठी तर अर्थव्यवस्थेच्या एकंदर गरजा लक्षात घेऊन पसस्परसंबंध, संतुलित मूल्यव्यवस्था निर्माण व्हावी यासाठी व उत्पादक आणि उपभोक्ता यांच्या हिताच्या रक्षणासाठी.

कृषिमूल्य आयोगासारख्या काड्यामोड्याच्या घोड्यावर इतक्या दुष्कर, अवजड जबाबदाऱ्या लादण्यात आल्या आहेत, की त्या त्याला पेलूच शकणार नाहीत.

तुलनात्मक किंमत सुचवणे या आयोगाच्या कुवतीबाहेरचे आहे. जडबंबाळ वाक्यरचना केली खरी, पण तिचा अर्थ काय? उदाहरणार्थ उसाचा भाव सुचवताना आयोगाने उसासाठी लागणाऱ्या सर्व वस्तूंचे भाव सुचवायचे काय? का उसापासून निर्माण होणाऱ्या इतर असंख्य वस्तूंचे भाव आयोगाने बांधून द्यायचे? का पर्यायी उत्पादनांची किंमत निश्चित करायची, साखरेच्याबरोबर वापरल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किमती ठरवायच्या? याचा उलगडा नाही. आयोगाने शहाणपणा एवढाच केला, की असल्या अनेक संभाव्य प्रश्नांना स्पर्शदेखील केला नाही, त्या भानगडीतच पडले नाहीत.

किमती ठरवण्यामधून कृषिमूल्य आयोगाने प्रत्येक पिकाखाली किती जमीन ठेवावी आणि भांडवल, साधनसामुग्री, खते, कीटकनाशके यांची पीकावर विभागणी कशी करावी याचेही नियंत्रण करणे ग्रहीत आहे काय? शेतीमालाच्या किमतीचा जीवनमान, मजुरी, औद्योगिक किमती यावर होणारा बरा-वाईट परिणाम ठरवण्याची कोणती साधने आयोगाजवळ आहेत? अर्थव्यवस्थेच्या एकुण गरजा आणि संतुलित किमती हे शब्द कशाशी खातात हे या आयोगाला माहीत आहे काय? कारण या प्रश्नांचा ऊहापोह नियोजन, वित्त, शेती, व्यापार मंत्रालये, नियोजन मंडळ आणि रिझर्व बँक अशा वरच्या पातळीवरील संस्थामधून केला जातो. कृषिमूल्य आयोगाच्या गरीब बिचाऱ्या सदस्यांनी हे शब्द शिकत असताना आणि पोट भरताना ऐकलेही असतील; पण या संकल्पनांची त्यांना अधिक माहिती असणे संभवतच नाही.

जर कृषिमूल्य आयोगाने अशा प्रचंड गुंतागुंतीच्या राष्ट्रीय महत्त्वाच्या घटकांची चर्चा करणे खरोखरच अभिप्रेत असेल तर आयोगाचे काम सध्यासारखे एकमार्गी राहून चालणार नाही. त्यासाठी सर्व संबंधित मंत्रालये आणि समित्यांनी आयोगाला




**शेतीचा गळा घोटण्याचेच सरकारचे धोरण असल्यामुळे एका लहानशा आयोगाचे त्यापुढे काही चालू नये हे स्वाभाविकच आहे. कृषिमूल्य आयोगाची कार्यपद्धती काहीही असो, ती शास्त्रीय निश्चितच नाही. कृषिमंत्रालयाच्या पातळीवरील किमती केवळ राजकिय सौदेबाजीनेच ठरतात. सुगीनंतरच्या खुल्या बाजारातल्या भावापेक्षा कमी भाव सामान्यपणे ठरवण्यात येतात आणि शेतकऱ्यांच्या साहाय्यासाठी सरकारी यंत्रणा कठीण वेळी पुढे येत नाही. त्यामुळे कृषिमूल्य आयोगाने निर्धारीत केलेले दर केवळ शेतीमालाचे भाव जास्तीत जास्त काढेपर्यंत चढू दिले जावेत याबद्दल व्यापाऱ्यांना मिळालेला इशाराच असतो. त्यांना प्रत्यक्ष फारसे महत्त्व नसतेच. अशा कृषिमूल्य आयोगामुळे शेतकऱ्याच्या डोळ्यात धूळफेक करून सरकारची शेतकरीद्रोही धोरणे दडवणे शासन यंत्रणेला सुलभ होते.**




वेळोवेळी स्वतःची उद्दिष्टे, योजना आणि कार्यक्रम यांची माहिती देणे आवश्यक होईल. आयोगाच्या गेल्या १८ वर्षांच्या कारकिर्दीत असे एकदा तरी घडले काय? त्यामुळे इतर गोष्टींचा विचार करण्याची भलतीच जबाबदारी आयोगावर टाकणे निरर्थक ठरते. यापूर्वीच कृषिमूल्य आयोगाची अशा जखडून टाकणाऱ्या जबाबदारीतून सोडवणूक करून त्याचे रूपांतर शास्त्रीय पध्दतीने विविध पिकांचे उत्पादनखर्च ठरवणाऱ्या संस्थेमध्ये करायला हवे होते. यासाठीच कृषिमूल्य आयोगाऐवजी कृषिउत्पादनखर्च आयोग नेमणे आवश्यक झाले आहे. शेतीमालाची किंमत अंतरमंत्रालयीन पातळीवरील एखाद्या मंडळाद्वारे उत्पादकाला प्रगत तंत्रज्ञान वापरून अधिकधिक उत्पादन करण्यासाठी योग्य उत्तेजन मिळावे आणि त्या किमतीचा मूल्यव्यवस्था, मजुरीचे दर, औद्योगिक किमती व अर्थव्यवस्थेच्या एकूण गरजा यांवर होणारा परिणामही विचारात घेऊन ठरवता येईल. मात्र असे करताना शेतकऱ्याला मिळणारे किमान दर उत्पादन-खर्चापेक्षा कधीही कमी असणार नाहीत हही पाहावे लागेल.

कृषिमूल्य आयोगामध्ये नेमके कोणते व कसे हिशाब केले जातात याविषयी अत्यंत गुप्तता राखली जाते. त्यामुळे त्याचे कामकाज सुधारण्याच्या दृष्टीने नेमक्या सूचना करणे कठीण आहे; तथापि काही उघड दिसणारे दोष तातडीने दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. प्रतिहेक्टरी उत्पादनखर्च ठरवताना सध्याचा कृषिमूल्य आयोग त्याला पुरविण्यात येणाऱ्या उत्पादनखर्चविषयक माहितीचा वापर करतो. ज्या शेताची सरसकट निवड होते त्यामध्ये प्रगत तंत्रे न वापरणाऱ्या शेतांची संख्या फार मोठी असते. खते आणि कीटकनाशकांचा या शेतामध्ये फारच कमी वापर झालेला असतो. त्यामुळे अशा माहितीवरून निघणाऱ्या वेगवेगळ्या सरासरी उत्पादनखर्चाचा एकमेकांशी काही संबंध नसतो आणि असे खर्च होणारे एखादे शेती प्रत्यक्ष पृथ्वीवर पाहावयास मिळणे शक्य नसते.

समजा ७००० हेक्टरांच्या पाहणीमध्ये केवळ ५०० हेक्टर्समध्येच कीटकनाशके वापरली असली तरी एकूण हिशेबात सरासरी काढताना ५०० हेक्टर्सवरचा खर्च ७००० हेक्टर्सनी भागून काढल्यावर येणारी सरासरी रक्कम केवळ दिशाभूल करणारी असेल, अशा रूक्ष आकडेमोडीमधून मिळणारे भाव इतके कमी असतील, की प्रगत तंत्र वापरून अधिक उत्पादन काढण्याची शेतकऱ्याचीच इच्छाच खच्ची होईल. अनेक युरोपीय देशांनी यासाठी संख्याशास्त्रीय नमुना पद्धत वापरून हे आक्षेप दूर केले आहेत. नमुना पद्धतीप्रमाणे जमवलेल्या आकडेवारीच्या आधाराने एक शेताचा सुसंगत नमुना उभा केला जातो. शेतात वापरली जाणारी सामुग्री आणि निघणारे उत्पादन यांची पातळी प्रत्येक वेळी देशातील प्रत्यक्ष परिस्थिती आणि राजकीय धोरणे लक्षात घेऊन ठरवली जाते.

'कृषिमूल्य आयोगाच्या हिशेब करण्याच्या पद्धतीत इतर अनेक त्रुटी आहेत. अनेक महत्त्वाच्या खर्च-घटकांचा त्यात विचारच नाही. आयोगाने कारभाऱ्याचा खर्च, अवजारांच्या दुरुस्तीचा खर्च, शेतापासून खरेदी केंद्र, जवळचा बाजार वा प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यापर्यंत माल नेताना होणारा वाहतूक खर्च याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.' (राव वीरेंद्रसिंग यांनी नवी दिल्ली येथे दि. २८ डिसेंबर १९८१ रोजी इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रीकल्चरल स्टॅटिस्टिक्सच्या ३५ व्या बैठकीत केलेल्या भाषामधून)

कृषिमूल्य आयोगाने पीक बुडण्याचा धोकाही विचारात घेतलेला दिसत नाही (राव वीरेंद्रसिंग यांचे उपरोक्त भाषण) व्यवस्थापनाच्या खर्चाकडेही दुर्लक्ष केले आहे. (राष्ट्रीय शेतीआयोग १९७६). जमिनीच्या किमतीचा अंदाज महसूल खात्याकडून कागदपत्रांवरून घेतला जातो. ही शेवटची पद्धत कायद्याप्रमाणे कदाचित योग्य असेल; परंतु त्यामुळे भांडवली खर्चाची रक्कम प्रत्यक्षापेक्षा फारच खाली उतरते.

कृषिमूल्य आयोगाच्या अहवालावरून असेही स्पष्ट दिसते, की आयोगाने शेतीसाठी पाणी उपलब्ध करण्यासाठी येणारा खर्च, साधनसामुग्री बसवण्याचा खर्च, घसारा भरून काढण्यासाठी लागणारी राखीव रक्कम, किमतीमधले चढउतार, संशोधन व विकसनासाठी येणारा खर्च, साधने किंवा पद्धती कालबाह्य जुन्या झाल्यामुळे होणारे नुकसान यांचा विचारच केलेला नाही.

कृषिमूल्य आयोगाने मजुरीचा हिशेब करताना सालदार मजुरांना मिळणारे दर विचारात घेतले आहे असे दिसते. आयोगाच्या मजुरीच्या हिशेबासाठी पायाभूत मानलेले दर त्यामुळेच सध्या कायद्याने ठरवलेल्या किमान मजुरीपेक्षा खूपच कमी आहेत. शिवाय मजुरीचा खर्च मजूर-दिवस पद्धतीने काढला जात असल्यामुळे सालदाराचे वार्षिक मजुरीचे दर विचारात घेणेही तर्कसंगत वाटत नाही.

नव्या कृषिउत्पादनखर्च आयोगाने उत्पादनखर्चाच्या हिशेबाने सर्व घोटाळे काढून टाकले पाहिजेत. आयोगाने ठरवलेल्या उत्पादनखर्चामध्ये विविध पिके घेता येतात याचे प्रात्यक्षिक दाखवणारी अनेक नमुना शेते आयोगाने देशभर तयार केली पाहिजेत. १८ वर्षे कागदी घोडे नाचवून शेतकऱ्यांच्या जिवाशी चाललेला आयोगाचा हा खेळ आता यापुढे चालू देता कामा नये.

अगदी अलीकडे (१९८१ मध्ये) केंद्राने ठरवलेल्या किमतीमध्ये काही प्रमाणात वाढ करण्याची परवानगी राज्य सरकारांना देण्यात आली होती. आपल्या देशाच्या विविध भागांतली शेतीच्या उत्पादनक्षमतेमधला फरक लक्षात घेता ही पद्धत वाजवीच होती. राष्ट्रीय शेती आयोगानेही अधिक उत्पादन करणाऱ्या वाहतूक खर्चाच्या रकमेइतकी लवचिकता स्वत:च्या राज्यातील दरात ठेवण्यास मान्यता दिली होती. ही पद्धत१९८१ मध्ये एकाएकी रद्दबातल करण्यात आली. निदान तिचा परत एकदा स्वीकार केला पाहिजे.

टंचाईच्या काळात सक्तीने लेव्हीने धान्य वसुली करण्याचा मार्ग सरकारला खुला असल्यामुळे त्या मानाने सुबत्तेच्या काळात आधारभूत किमतींना धान्य खरेदी करण्याचे बंधनही सरकारवर असलेच पाहिजे.

सरकारी खरेदी यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे जर शेतकऱ्याला त्याचा शेतीमाल उत्पादन खर्चापेक्षा कमी भावात विकावा लागला तर सरकारवर त्यामधील फरकाची शेतकऱ्याला भरपाई करून देण्याची जबाबदारी असली पाहिजे. सध्याचा कृषिमूल्य आयोग मोडीत काढून त्याच्या ठिकाणी अधिक आटोपशीर आणि काम करणारा कृषिउत्पादन खर्च आयोग आणण्यातच शेतकऱ्याचे हित आहे. या नव्या आयोगामुळे शासनाची शेतकरी-द्रोही धोरणेच मुळातून बदलतील असे नाही; मात्र ती लपवून ठेवणे शासनाला अवघड होईल.

(पूर्वप्रसिद्धी : पाक्षिक शेतकरी संघटक २१ नोव्हेंबर १९८३)

■■

# कृषिमूल्य आयोग : कसाबाचे कसब

**कृषिमूल्य आयोगाची कागदपत्रे अत्यंत गोपनीय समजली जातात. शास्त्रीय काम करणाऱ्या आयोगाला अशा तऱ्हेचे गुप्तता राखण्याचे काहीच कारण नाही. त्यामुळे मी आजपर्यंत आयोगाच्या कामकाजासंबंधी मिळालेली माहितीसुद्धा प्रकाशात आणली नव्हती. अशा हेतूने, की ज्या मित्रांनी ही माहिति उपलब्ध करून दिली ते धोक्यात येऊ नयेत; पण राव वीरेंद्रसिंगच्या घमेंडखोर थापेबाजीचा समाचार घेण्यासाठी मी काही गुप्त आकडेवारी प्रकट करून कृषिमूल्य आयोगाच्या शास्त्रीय ढोंगाचा बुरखा फाडण्याचे ठरवले.**

१९८१ साली विदर्भात एका गावच्या सभेनंतर एक तरुण अधिकारी मला भेटावयास आला. केंद्रीय गुप्तहेर खात्यातर्फे त्याला दिल्लीहून मुद्दाम पाठविण्यात आले होते. पूर्वी मी सनदी नोकरीत असल्यामुळे अनेक सनदी अधिकाऱ्यांना शेतकरी संघटनेविषयी बरेच कुतूहल वाटत असते. बोलता बोलता तो म्हणाला 'वर्षा दीड वर्षांत शेतकरी संघटनेची जी विलक्षण झपाट्याने वाढ होत आहे त्याचे रहस्य काय?' मी हसत म्हटले, 'त्यात रहस्य वगैरे काही नाही. आमचा एक फार ताकदवान कार्यकर्ता आहे. त्याच्यामुळेच संघटना इतक्या अफाट वेगाने वाढत आहे.' अधिकारी कान टवकारून ऐकू लागला. 'हा कोण बुवा कार्यकर्ता?'

'तुम्हाला म्हणून त्याचे नाव सांगतो. राव वीरेंद्रसिंग. रावसाहेब शेतकीमंत्री नसते तर शेतकरी संघटनेची वाढ इतकी झपाट्याने होऊच शकली नसती. आता पाहा. ज्वारीचा भाव दोन वर्षे झाली १२४ रु. क्विंटल कायम आहे. इतर सगळ्या वस्तूंच्या किमती कडाडल्या; पण ज्वारीची, भाताची किंमत जिथल्या तिथे. क्विंटलमागे एक रुपया वाढवून दिला असता तरी संघटनेचे काम कठीण झाले असते. शेतकऱ्यांना पटवून द्यावे लागले असते, की एक रुपया वाढ ही अपुरी आहे. ज्वारीच्या भावात काहीच वाढ नाही. यातला घनघोर अन्याय समजून सांगण्याची गरजच राहत नाही.''

शासनाचे धोरण शेतकरीविरोधी तर कायमचेच राहिले आहे; पण धोरण राबविणारा गोड बोलणारा, सौजन्य दाखवणारा असेल तर शेतकऱ्यांचा क्षोभ कमी होतो. कोणताही मुद्दा आडदांडपणे, उर्मटपणे मांडण्याची राव वीरेंद्रसिंग यांची शैली शेतकरी आंदोलनाला मोठे वरदान ठरली आहे.

रावसाहेबांच्या कर्झनशैलीचे अगदी ताजे उदाहरण पाहा.

कृषिमूल्य आयोगाच्या कामकाजाविषयी असमाधान, असंतोष काही नवा नाही. आयोगाची भूमिका, कार्यपद्धती याबद्दल अनेकांनी टीका केलेली आहे. कृषिमूल्य आयोग म्हणजे काही आदरपात्र सर्वोच्च न्यायालय नाही. पंढरपूरच्या साकडे मेळाव्यानंतर शेतकरी संघटनेने हा आयोग बरखास्त करून त्या जागी कृषिउत्पादनखर्च आयोग नेमावा ही मागणी पहिल्यांदा केली. या विषयावर तपशीलवार निवेदनही दिले. संघटनेच्या या मागणीला इतर राज्यांतील शेतकरी संघटनांनीही पाठिंबा दिला. लोकदलासारख्या राजकीय विरोधी पक्षांनी दिला. आयोग बरखास्त करा अशी मागणी राज्यकर्त्या पक्षांच्या नेत्यांनीसुद्धा केली. लोकसभेचे सभापती बलराम जाखड यांच्या भारत कृषक समाजानेही ही मागणी केली.

या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी शेतकरी संघटनांच्या आंतरराज्य समन्वय समितीने परभणी अधिवेशनात आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर केला. धान्यबंदी, कर्जबंदी, गावबंदी, इंडियाबंदी, असा प्रचंड व्यापक आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर केला. कार्यक्रम शेतकरी संघटनांना एवढा मोठा कार्यक्रम पेलवेल किंवा नाही अशी शंका बाळगणाऱ्यांना चंडीगड येथील राजभवनाच्या यशस्वी घेराओने चोख उत्तर मिळाले. १ मे ते ७ मे १९८४ पर्यंत पंजाबच्या गृह बाजारात शुकशुकाट राहिला. धान्यबंदीची सुरुवात झाली. जून महिन्याच्या मध्यापासून गहू वाहतूक थांबवण्याची मोहीम पंजाबमध्ये घेतली जाणार आहे. अशा परिस्थितीत लोकसभेत आणि राज्यसभेतही हा प्रश्न उठविण्यात आला. वादविवादाला उत्तर देताना राव वीरेंद्रसिंग बोलते झाले, 'कृषिमूल्य आयोग ही शास्त्रीय स्वरूपाची संघटना आहे. गाव पंचायतीसारखी त्यात मेंबरांची भरताड करून चालणार नाही.' कृषिमूल्य आयोग हा शास्त्रीय स्वरूपाचा आहे हे वाक्य ऐकून खूप हसू आले. स्वतः राव वीरेंद्रसिंग यांनी डिसेंबर १९८१ मध्ये या कृषिमूल्य आयोगाच्या कामासंबंधी काय उद्‌गार काढले होते माहीत आहे?

शेतीविषय संख्याशास्त्राच्या ३५ व्या अखिल भारतीय अधिवेशनात दिल्ली येथे बोलताना रावसाहेबांनी स्वतः मान्य केले होते, 'शेतीसाठी लागणाऱ्या सामुग्रीची जमवाजमव, औत-अवजारांचा दुरुस्तीखर्च, वाहतूकखर्च इत्यादी खर्च कृषिमूल्य आयोगाने आजपर्यंत हिशेबात घेतले नव्हते.'

स्थापनेपासून १६ वर्षे एवढे महत्त्वाचे खर्च हिशेबात घेण्याचे विसरून गेलेल्या आयोगाला रावबहादूर आज शास्त्रीयतेचे प्रमाणपत्र खुले आम लोकसभेत देऊ करत आहेत.

कृषिमूल्य आयोगाची कागदपत्रे अत्यंत गोपनीय समजली जातात. शास्त्रीय काम करणाऱ्या आयोगाला अशा तऱ्हेचे गुप्तता राखण्याचे काहीच कारण नाही. त्यामुळे मी आजपर्यंत आयोगाच्या कामकाजासंबंधी मिळालेली माहितीसुद्धा प्रकाशात आणली नव्हती. अशा हेतूने, की ज्या मित्रांनी ही माहिती उपलब्ध करून दिली ते धोक्यात येऊ नयेत; पण राव वीरेंद्रसिंगच्या घमेंडखोर थापेबाजीचा समाचार घेण्यासाठी मी काही गुप्त आकडेवारी प्रकट करून कृषिमूल्य आयोगाच्या शास्त्रीय ढोंगाचा बुरखा फाडण्याचे ठरवले आहे.

विहिरी खणून, नलिकाकूप तयार करून, दूरदूरचे पाणी खेचून आणून शेती यशस्वी करण्याचे भगीरथ प्रयत्न अनेक शेतकरी करीत असतात. अशा तऱ्हेचे शेतात पाणी आले म्हणजे घरी लक्ष्मी पाणी भरेल अशी वेडी आशा. यापुढे असे प्रयत्न करण्याआधी शेतकऱ्यांनी खालील हिशेब लक्षात घ्यावा.

पंजाबमध्ये विजेचा दर हॉर्स पॉवरमागे महिना रु. १७-५० एवढा आहे. तीन हॉर्स पॉवरच्या मोटारीवर विजेचे बिल सहा महिन्यात रु. ३१५/- इतके होईल. एवढ्या मोटारीवर दोन हेक्टर म्हणजे ५ एकर गव्हाला पाणी देता येईल. याचाच अर्थ एक हेक्टर गव्हाला पाणी देण्याचा केवळ विजेच्या बिलाचा खर्च रु. १५७-५० इतका होतो. यात विहीर खणणे, विहीर बांधणे, मोटार, स्टार्टर, विजेचे

कनेक्शन कशा कशाचा खर्च धरलेला नाही. कोणत्याही पिकास दरहेक्टरी दरमहा रु. २६-२५ इतका विजेचा खर्च आहे. महाराष्ट्रात हाच खर्च पुष्कळच कमी आहे. महाराष्ट्रात विजेचा खर्च दरहेक्टरी दरमहा रु. १५-६८ इतका येतो. आता कृषिमूल्य आयोग किती खर्च लक्षात घेत असेल म्हणता? खालील आकडे डोळे उघडून बघा.

| राज्य/पीक | पाणी देण्यासाठी येणारा विजेच्या बिलाचा खर्च | वर्ष | कृषिमूल्य आयोगाने पाणी पुरवठ्यासाठी धरलेला एकूण खर्च |
|---|---|---|---|
| पंजाब/गहू | ११७-०० | १९७७-७८ | १२३-४९ |
| | ११७-०० | १९७८-७९ | १०५-१० |
| | ११७-०० | १९७९-८० | ११८-४६ |
| | ११७-०० | १९८०-८१ | ७०-८६ |
| | १५७-५० | १९८१-८२ | ७८-०० |
| पंजाब/भात | ११७-०० | १९७८-७९ | २९८-०० |
| | ११७-०० | १९७९-८० | ११९-०० |
| पंजाब/ऊस | २३४-०० | १९७५-७६ | २६८-९९ |

पाणीपुरठ्यासाठी धरलेली रक्कम विजेचे बिल भरण्यासही अपुरी आहे. एवढेच नव्हे तर पाणीपुरवठ्याच्या खर्चाची रक्कम वर्षानुवर्षे कमी होताना दाखविली जात आहे. हा खर्च कमी होण्याचे काय कारण आहे? मग शास्त्रीय कृषिमूल्य आयोगाच्या नजरेतून हा प्रकार कसा निसटला?

तुम्ही शेणखत काय भावाने विकत घेता? यंदा आंबेठाणमध्ये सर्वसाधारणपणे ३ क्विंटल शेणखताच्या गाडीला रु. ५० द्यावे लागतात. कृषिमूल्य आयोग अशा गाडीचा खर्च किती धरते? फक्त ३ ते ३॥ रुपये म्हणजे जवळपास रुपया क्विंटल. हे पाहा कृषिमूल्य आयोगाचे हिशेब :

| राज्य/पीक | वर्ष | वापरलेले खत क्विंटल | खताचा खर्च रुपये | खताची किंमत प्रतिक्विंटल रुपये |
|---|---|---|---|---|
| पंजाब/गहू | १९७७-७८ | २६.३३ | ३३.६२ | १.२७ |
| | १९७८-७९ | ५.७६ | ६.७३ | १.१८ |
| | १९७९-८० | ५.१९ | ६.८४ | १.३२ |
| | १९८०-८१ | ३.४० | ३.८७ | १.१४ |
| पंजाब/भात | १९७८-७९ | १७.७८ | २२.०८ | १.२४ |
| पंजाब/ऊस | १९७३-७४ | १२९.९७ | १२९.७३ | ०.९९ |
| | १९७४-७५ | ८५.२१ | ८६.७४ | १.०२ |
| | १९७५-७६ | ६४.९० | ९०.०९ | १.३७ |
| पंजाब/कापूस | १९७९-८० | २१.९१ | २९.८५ | १.३७ |
| | १९८०-८१ | १२.७१ | १८.९६ | १.३९ |

वर्षानुवर्षे प्रत्येक पिकात ही चूक होऊ शकतेच कशी? दरवर्षी दर पिकात शेणखताचा वापर घटत आहे, याच्या कारणांचा आयोगाने काही अभ्यास केला नाही. रुपयाला क्विंटल शेणखताचा खर्च धरणाऱ्या या आयोगाला काय म्हणावे? शेतकीमंत्री म्हणतात शास्त्रीय आणि आर्थिक!

आता कडेलोट पाहा.

एक हेक्टर औषध फवारणीचा खर्च कृषिमूल्य आयोग किती धरत असेल?

| राज्य/पीक | वर्ष | एक हेक्टर पिकावर औषध फवारणीचा खर्च (रुपये) |
|---|---|---|
| पंजाब/गहू | १९७०-७१ | १.४१ |
| | १९७१-७२ | ०.४७ |
| | १९७२-७३ | ३.३७ |
| | १९७३-७४ | ७.१२ |
| | १९७४-७५ | १.१६ |
| | १९७५-७६ | २.२२ |
| | १९७६-७७ | ०.०१ |
| | १९७७-७८ | ०.९५ |
| | १९७८-७९ | ५.७३ |
| | १९७९-८० | ९.९७ |
| | १९८०-८१ | १४.१६ |
| पंजाब/भात | १९७८-७९ | ५६.७८ |
| | १९७९-८० | २२.७५ |
| पंजाब/ ऊस | १९७३-७४ | ११.९८ |
| | १९७४-७५ | ८.२९ |
| | १९७५-७६ | १२.७५ |

भाताच्या पिकासाठी १९७८-७९ साली सर्वांत जास्त औषध फवारणी खर्च करण्यात आला आहे, म्हणजे रु. ५६-७८. हा खर्च एका फवारणीसाठीसुद्धा अपुराच आहे; पण १९७६-७७ साली गव्हासाठी हा खर्च केवळ एक पैसा झाला आहे. म्हणजे औषध फवारणीसाठी कृषिमूल्य आयोगाने त्या साली काय वापरले तरी काय होते? ठरवूनसुद्धा असेल आचरट हिशेब काढणे कठीण होईल!

वर्षानुवर्षे अशा ढालगज हिशेबांनी शेतकऱ्यांना फसविण्यात कृषिमूल्य आयोगाने शासनाला मदत केली आहे. हे भयानक हिशेब लपविण्यासाठी आपले सगळे कागदपत्र गुप्त ठेवले. आमच्या पुढाऱ्यांनी आम्हाला हे कारस्थान कधी सांगितले नाही. वर रावबहाद्दर बीरेंद्रसिंगजी या आयोगाला शास्त्रीयतेचे सर्टिफिकेट देऊ करतात! गावपंचायती म्हणजे काही कार्यक्षमतेचा अवतार नाहीत; पण त्यासुद्धा निव्वळ गळथटपणात कृषिमूल्य आयोगाच्या पासंगालासुद्धा पुरणार नाहीत. रावबहादुरांनी निदान गावोगावच्या पंचायतींची मा मागायला हवी.

(पूर्वप्रसिद्धी : पाक्षिक शेतकरी संघटक १ जून १९८४)

**शरद जोशी**
sharadjoshi.mah@gmail.com

■■

# एफडीआयचे स्वागत हवे

-शरद जोशी

'भाजपचा विरोध आश्चर्यकारक आहे. पंतप्रधान वाजपेयी या क्षेत्रात १०० टक्के परकीय गुंतवणुकीबाबत बोलत होते, पण आता ५१ टक्के गुंतवणुकीला विरोध होत आहे...'

सध्या देशात किरकोळ क्षेत्रातील परकीय गुंतवणुकीवरून धुमाकूळ सुरू आहे. संसदेचे कामकाजही बंद पाडण्यात आले आहे. पण किरकोळ क्षेत्रातील परकीय गुंतवणुकीत नवीन ते काय आहे? आपल्याकडे या क्षेत्रात एक ब्रॅन्ड असलेल्या परदेशी कंपन्यांना परवानगी आहे, त्या येथे कार्यरतही आहेत. क्रीडाविषयक उत्पादने असलेल्या कंपन्या, होंडासारखी कंपनी ही त्याचीच उदाहरणे! त्याबाबत कोणी विरोध केल्याचे ऐकिवात नाही. आता मुद्दा आहे तो अनेक ब्रॅन्डमध्ये होणाऱ्या थेट परकीय गुंतवणुकीचा. त्याचा मुख्यतः शेतीमालाशी संबंध आहे. भाजीपाला, दूध-दुग्धजन्य पदार्थ, फळे, डाळी, शेंगदाणा, अन्नधान्य यांसारख्या किराणा मालात अशी गुंतवणूक येत असल्याने त्याला विरोध होत आहे. प्रत्यक्षात आता अशा गुंतवणुकीची आवश्यकता आहे आणि आम्हीच या संकल्पनेचे उद्गातेसुद्धा आहोत.

किरकोळ क्षेत्रात अशा परकीय गुंतवणुकीचा निर्णय घेण्याची वेळ आपल्यावर का आली? कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी योग्य प्रकारे काम केले असते, तर हे इतक्या प्रमाणावर करण्याची कदाचित गरज पडली नसती. शेतकऱ्यांनी निर्माण केलेला शेतीमाल योग्य पद्धतीने आणणे, तो साठविणे, त्यावर प्रक्रिया करणे आणि तो ग्राहकांपर्यंत पोहोचविणे या कामात या कृषिउत्पन्न बाजार समित्या यशस्वी ठरल्या असत्या, तर परिस्थिती वेगळी असती. टोमॅटोचे विक्रमी उत्पादन जास्त झाले तर काय करायचे, असा प्रश्न पुणे कृषिउत्पन्न बाजार समितीला पडला होता. तेव्हा मी त्यांना, जिल्ह्याच्या तीन भागांत प्रक्रिया करणारी यंत्रणा उभी करण्याबाबत सुचविले होते. जास्त माल असेल तेव्हा त्याची प्रतवारी करून वेगवेगळ्या कारणांसाठी त्याचा उपयोग करून घेण्याची व्यवस्था या समित्यांनी निर्माण करायला हवी होती. अशा अनेक जबाबदाऱ्या या समित्या पार पाडू शकल्या नाहीत. अलीकडे तर कृषिउत्पन्न बाजार समित्या म्हणजे मोठ्या पुढाऱ्यांच्या पोरांचे खेळण्याचे साधन बनल्या आहेत. या समित्यांकडे असलेल्या जमिनीतच त्यांना रस आहे. ते जमिनींच्या व्यवहारात गुंतले आणि त्यांनी मूळ कामाकडे दुर्लक्ष केले. शेतमाल ग्राहकांपर्यंत योग्य पद्धतीने पोहोचविण्यासाठीच्या सुविधा अस्तित्वातच नाहीत. शेतात निर्माण होणारा माल ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध सुविधा अत्यंत गरजेच्या आहेत. त्यात चांगले रस्ते, दळणवळण यंत्रणा, मालाची विभागणी, प्रतवारी, त्याची साठवणूक, गरज पडल्यास त्यांच्या निर्यातीची तयारी या सर्व गोष्टी आल्या. या गोष्टींसाठीच थेट परकीय गुंतवणुकीची जरूरी आहे. शेतीमालाच्या किरकोळ विक्रीच्या या व्यवसायात सध्या रिलायन्स उद्योगसमूह आहे. मात्र, त्यांच्या भाज्या व फळे ताजी नसल्याची तक्रार आहे. याचे कारण तो माल रिलायन्सच्या आउटलेटपर्यंत पोहोचविण्यापर्यंतची जी सुविधांची साखळी हवी, ती अपुरी आहे. त्यामुळे ना ग्राहक समाधानी आहे, ना शेतकऱ्याला मालाचा चांगला मोबदला मिळतो आहे. अशा सुविधांच्या साखळ्या उभ्या राहिल्यास ग्राहकांनासुद्धा ताजा व विविध प्रकारचा माल उपलब्ध होईल. त्यातून त्याला चांगली निवड करण्याची संधीसुद्धा प्राप्त होईल. ही सुविधांची साखळी नसल्यामुळे आपला शेतकरी जगाच्या बाजारपेठेशी स्पर्धा करू शकत नाही. त्याचा शेतात उभा असलेला माल स्पर्धात्मक असतो, पण तो मुंबई बंदरात पोहोचेपर्यंत वेळ जातो आणि अनेक अडचणी उभ्या राहतात. परकीय गुंतवणुकीमुळे या सुविधा उभ्या राहण्याची शक्यता असल्याने ते शेतकरी आणि ग्राहकांसाठीसुद्धा फायदेशीर ठरेल.

आपल्याला गुंतवणुकीची गरज आहे ती केवळ या सुविधांच्या साखळ्या उभ्या करण्यासाठीच. शेतीमध्ये सरकारी आणि खासगी गुंतवणूक कधीच पुरेशी झाली नाही. अशा गुंतवणुकीला सरकारचाच मोठा विरोध राहिला आहे. त्यामुळे शेती क्षेत्राकडे झालेल्या दुर्लक्षाचे संचित खूपच वाढले आहे. ते दूर करण्यासाठी आता या परकीय गुंतवणुकीची आवश्यकता आहे. खरंतर मनमोहन सिंग हेसुद्धा पूर्वी या क्षेत्रात थेट गुंतवणुकीबाबत अनुकूल नव्हते. या गुंतवणुकीमुळे रोजगारनिर्मिती होईल, हे त्यांना पटत नव्हते. त्या वेळी म्हणजे १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला मी त्यांना भेटून ही बाब आवश्यक असल्याचे सांगितले होते. केवळ मॉलच्या काउंटरला दिसणाऱ्या लोकांकडे पाहू नका, तर त्यांच्यामागे जी सुविधांची साखळी उभी राहणार आहे, त्यात किती मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणार आहे त्याकडे पाहा, असा सल्ला दिला होता. त्या वेळी सकारात्मक नसलेल्या मनमोहन सिंग यांनी आता थेट परकीय गुंतवणुकीची आमचीच कल्पना उटलून धरली आहे. म्हणूनच ते परकीय गुंतवणुकीच्या धोरणाला चिकटून राहतात का, हे पाहायचे आहे.

दुसरा मुद्दा आहे - स्थानिक व्यापाऱ्यांवरील परिणामाचा. याबाबत व्यक्त होणारी भीती अनाठायी आहे. जगभरात जिथे जिथे असे परकीय भांडवल आले, त्या एकाही देशातील किराणा व्यापाऱ्यांची दुकाने बंद पडलेली नाहीत. याचे मूलभूत कारण म्हणजे मोठमोठी मॉल्स आणि किराणा व्यापारी या दोन्हींची आपापली बलस्थाने आहेत. कोपऱ्या-कोपऱ्यावर असणाऱ्या किराणा व्यापाऱ्याचे ग्राहकांशी असलेले वैयक्तिक संबंध आणि त्यांच्या आवडी-निवडी पुरविण्याची क्षमता मॉलकडे कधीच येऊ शकणार नाहीत. तीसुद्धा अनेक ग्राहकांची गरज असते. त्यामुळे या मुद्यावर होणारा विरोध अनावश्यक आहे. व्यापाऱ्यांच्या संख्येबाबत दिली जाणारी आकडेवारीसुद्धा दिशाभूल करणारी आहे. या धोरणाला भारतीय जनता पक्षाकडून होत असलेला विरोध पाहून आश्चर्य वाटते. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळात पंतप्रधान वाजपेयी या क्षेत्रात १०० टक्के परकीय गुंतवणुकीबाबत बोलत होते, पण आता ५१ टक्के गुंतवणुकीला विरोध होत आहे. त्या वेळी मी स्वतः नितीन गडकरी यांना अशा गोष्टींची गरज सांगितली होती. गडकरी यांच्या नेतृत्वाखाली पूर्ती नावाची सुपरमार्केट उभी राहिली. आता अशा गडकरींनी भाजपचे अध्यक्ष म्हणून या धोरणाला विरोध करावा, यात केवळ त्यांचा राजकीय हिशेब दिसतो. देशात २० टक्के असलेल्या व्यापाऱ्यांचा विचार ते करत असावेत. त्याचा कदाचित तत्कालीक फायदा होईलही, पण त्यामुळे ६० टक्के शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केले, तर त्याचे पक्षावर दीर्घकालीन परिणाम होतील. आधीच मध्यमवर्गीय व्यापाऱ्यांचा पक्ष अशी भाजपची प्रतिमा आहे. त्यात अडकून स्वत:चा बळी जाणार नाही याची त्यांनी काळजी घ्यायला हवी. पक्षात मुरलीमनोहर जोशी यांच्यासारखे मागास विचारांचे नेते आहेत. कदाचित या मुद्द्यांवर त्यांना पटविता न आल्याने पक्षाने विरोधाचे धोरण स्वीकारले असेल; पण वाजपेयी पंतप्रधान असताना त्यांनी समान नागरी कायदा, राममंदिर असे धार्मिक मुद्दे बाजूला ठेवून आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला. त्याचा परिणाम म्हणून त्यांच्या सरकारच्या शेवटच्या काळात विकासाचा वेग १० टक्क्यांपर्यंत पोहोचला होता. त्यांच्याकडूनच या धोरणाला होणारा विरोध दुर्दैवी आहे. थेट परकीय गुंतवणूक करत येणाऱ्या कंपन्या त्यांच्या फायद्यासाठी का होईना, सुविधांची साखळी उभी करतील. त्याचा फायदा शेतकऱ्यांना आणि ग्राहकांनासुद्धा होणार आहे. त्याचे आपण स्वागतच करायला हवे!

**शरद जोशी**

(शब्दांकन - अभिजित घोरपडे)

दै. लोकसत्ता शनिवार, ३ डिसेंबर २०११ मधून साभार

■■

# रिटेलची रिॲलिटी

**शेतकऱ्यांची संख्या देशामध्ये सर्वाधिक आहे आणि देशातील एकूण एक व्यक्ती ही ग्राहक आहे. हे दोन्हीही संघटीत नसल्यामुळे व्यापाऱ्यांचे फावते. एफडीआयला विरोध करताना नेमके हेच कारण घडले. देशातील सर्व शेतकरी संघटनांनी एफडीआयला आपला पाठिंबा जाहीर केला. त्यांचा आवाज मात्र संसदेतील विरोधी पक्षांनी उठवलेल्या आवाजामध्ये पोहोचू शकला नाही. शेतकऱ्यांनी निवडून दिलेले जवळजवळ ८०% प्रतिनिधी संसदेत असतानाही त्यांनी आपले तोंड बंद ठेवले.**



**ज्ञानेश्वर शेलार**

देशात किरकोळ व्यापारक्षेत्रात ५१% परकीय भांडवलाला (एफडीआय) परवानगी देण्यावरून संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचे दोन आठवडे वाया गेले. अंदाजे पाच कोटी छोटे व्यापारी देशामध्ये आहेत. त्यांनी देशभर बंद पाळून आपला निषेध नोंदवला. सर्व विरोधी पक्षांनी एफडीआयला संसदेमध्ये विरोध केला. ममतांनी तर सरकार पाडण्याची धमकी दिली. डाव्यांचा विरोध हा सुरुवातीपासूनच होता. ज्या भाजपने अटलबिहारी वाजपेयींच्या काळात किरकोळ व्यापारक्षेत्रामध्ये १००% एफडीआय असावे असा प्रयत्न केला, त्या भाजपनेच कोलांटी उडी मारून ५१ टक्क्यांनाही विरोध केला. हा उघड उघड राजकारणाचा खेळ झाला. अर्थशास्त्र आणि नवीन तंत्रज्ञान हे राजकारणाच्या वावटळीत उडून गेले. कदाचित काँग्रेस पक्ष विरोधात असता, तरीही चित्र फारसे बदलले नसते. भाजपने जी भूमिका आज घेतली. ती काँग्रेसने घेतली असती. सर्व निर्णय राजकारणप्रेरित आहेत. जनतेचा विचार फार कमी होतो.

एफडीआयला विरोध करताना नेहमीप्रमाणेच छोट्या व्यापाऱ्यांचे आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांचे काय होईल? देश अमेरिकेकडे गहाण पडेल, बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्याला गुलाम बनवतील, ही कारणे देण्यात आली. सध्यातरी आपल्या पारंपरिक व्यापारामध्ये सचोटीने व्यापार अशी काही चीज शिल्लक राहिलेली नाही. काटा मारणे, भेसळ करणे, अवाच्या सव्वा किंमत सांगून घासाघीस करणे, मालाची नसलेली गुणवत्ता वाढवून सांगणे असे अनेक प्रकार गिऱ्हाईकांना फसविण्यासाठी करणे, ही बनियावृत्ती ज्याच्यामध्ये जास्त असेल तो यशस्वी व्यापारी, अशी सर्वांचीच धारणा झालेली आहे. व्यापारक्षेत्र हे सध्यातरी असंघटीत आहे, असे म्हणता येणार नाही. छोट्या छोट्या व्यापारी संघटना त्या नसतील तरी केवळ एका हाकेवर बाजारपेठ बंद करण्याची ताकद छोट्या व्यापाऱ्यांमध्ये आहे. या ताकदीवरच केव्हाही व्यापार बंद ठेवून ग्राहकांना वेठीस धरणे त्यांना शक्य होते. शेतकरी आणि ग्राहक हे संघटीत नसल्यामुळे त्यांना अशा प्रकारे बंद पाळणे किंवा अन्य प्रकारे प्रभाव पाडणे केव्हाही शक्य होत नाही. याच कारणाने शेतकरी आणि ग्राहक हे नेहमीच भरडले जातात. व्यापारी व दलाल यांची साखळी तयार होते आणि ते आपल्या मर्जीप्रमाणे व्यापाराला वळण देतात.

देशातील भाववाढीबद्दल मोठा गदारोळ चालू आहे. भाववाढ कशी होते याचा थोडा विचार केल्यास आपल्याला हे सहज शोधून काढता येईल. शेतीमालाच्या बाबतीत तर हा क्रम १,२,३,४ असा आहे. याचा अर्थ एखादी पीक शेतीत घेतले आणि त्याची किंमत १ रुपया असेल, तर घाऊक व्यापारात २ रुपये, त्या पुढच्या दलालाकडे ३ रुपये आणि प्रत्यक्ष ग्राहकाला ४ रुपयांना मिळते, कधी कधी पाच रुपयांनासुद्धा! कांद्याचे उदाहरण घेतले तर- २० रुपये किलो शेतकऱ्याने विकलेला कांदा मधल्या दलालांच्या साखळीने ४० रुपये, ६० रुपये आणि ग्राहकाला दिल्लीत आणि मुंबईत ८० ते १०० रुपये असा मिळतो. शेतीमालाच्या कमी भावाचे आणि ग्राहकांना मिळणाऱ्या महाग वस्तूंचे हे गमक आहे.

शेतकऱ्यांची संख्या देशामध्ये सर्वाधिक आहे आणि देशातील एकूण एक व्यक्ती ही ग्राहक आहे. हे दोन्हीही संघटीत नसल्यामुळे व्यापाऱ्यांचे फावते. एफडीआयला विरोध करताना नेमके हेच कारण घडले. देशातील सर्व शेतकरी संघटनांनी एफडीआयला आपला पाठिंबा जाहीर केला. त्यांचा आवाज मात्र संसदेतील विरोधी पक्षांनी उठवलेल्या आवाजामध्ये पोहोचू शकला नाही. हा आवाज बाहेरून उठवण्याचा प्रयत्न केला तरी शेवटी निर्णय प्रक्रिया घडणार ती संसदेतच. नसता अण्णांना सध्या जी दुषणे देण्यात येतात तशीच दुषणे शेतकऱ्यांनाही देण्यात आली असती. शेतकऱ्यांनी निवडून दिलेले जवळजवळ ८०% प्रतिनिधी संसदेत असतानाही त्यांना आपले तोंड बंद ठेवावे लागले. युपीए २ मध्ये सामील असलेल्या सर्व घटक पक्षांनी आपण गरिबांच्या बाजूने आहोत आणि छोट्या व्यापाऱ्यांचा धंदा बसू नये, त्यांचे नुकसान होऊ नये यासाठी त्यांच्या बाजूने आहोत. बहुराष्ट्रीय कंपन्या एफडीआयच्या रुपाने भारतात आल्या तर सुरुवातीला त्या कमी किमतीत माल देतील. छोट्या व्यापाऱ्यांचा धंदा बसल्यानंतर मात्र त्या भाववाढ करतील आणि त्यानंतर ग्राहकांना त्यांच्याकडे जाण्याशिवाय पर्याय नसेल, अशी भीती दाखवण्यात आली. जगभर मात्र असा अनुभव नाही. मोठ्या कंपन्यांच्या मॉल्स बरोबरच अगदीच त्यांच्याच समोर त्या फुटपाथवर आणि रस्त्यावर- हातगाड्यांवरही लोक खरेदी करतात, असा अनुभव आहे. तरीही एफडीआयला विरोध करण्यात आला. देशात भांडवलाची चणचण आहे. तंत्रज्ञानाची वाणवा आहे. शेतीक्षेत्राकडे तर अक्षम्य दुर्लक्ष करण्यात आले आहे आणि शेतीमालाचे भाव पाडूनच सर्व कारभार चालू आहे, असे असतानाही शेती, उद्योग आणि व्यापार यांची परस्पर सरकारच्या हस्तक्षेप विरहीत एखादी साखळी उभी राहत असेल, तर त्यामध्ये हस्तक्षेप करण्याला विरोधी पक्षांनी भाग पाडले आहे.

एफडीआयच्या आगमनामुळे शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. त्यांच्या मालाला योग्य किंमत आणि कायमस्वरूपी खरेदीदार मिळणार आहे. मोठ्या कंपन्यांना आपला माल छोट्या उद्योजक व शेतकऱ्यांकडूनच पाहिजे तसा तयार करून घ्यावा लागणार आहे. व्यापारामध्ये जी चलाखी चालते ती बंद होणार आहे. व्यवस्थित पॅकिंग केलेला, वजनमाप लिहिलेला आणि ज्या पद्धतीचा माल आहे असा दावा केलेला आहे तशाच पद्धतीचा माल पुरवठादारांनी पुरवणे आणि मॉलमध्ये तो विकणे हे बंधनकारक होणार आहे. सध्याची शेतीमालाची जी विस्कळीत पद्धत आहे ती बंद होईल. शेतीमालाचा सर्रास लिलाव करणे, खरेदी दराने भाव ठरवणे, वाहतूक-कमीशन इत्यादी शेतकऱ्यांच्या माथी मारणे या सर्व गोष्टींना फाटा मिळणार आहे. उद्योगात तयार झालेल्या मालाची विक्री करताना सर्व प्रकारचे कर वाहतूक, घट इत्यादी लावून मालाची किंमत छापली जाते आणि ती ग्राहकाकडून वसूल केली जाते. शेतीमालाच्या बाबतीत मात्र लिलाव केला जातो आणि त्या लिलावातूनही वाहतूक, कर, घट, पॅकिंग इत्यादींचे पैसे वसूल केले जातात. शेतीमालाची व्यवस्थित हाताळणी, वाहतूक, साठवणूक आणि पॅकिंग न होण्यामागे हेच मोठे कारण आहे. शेतकऱ्याला आधीच तोट्यात माल विकून या सर्व गोष्टी करणे शक्य नसते. त्याचा ग्राहकांनाही फटका बसतो. उत्तम प्रतीचा ताजा, भेसळ नसलेला, योग्य मापाने मोजलेला, पॅकिंग केलेला शेतमाल ग्राहकांना कधीच मिळत नाही. आता कुठे मॉल्समधून अशी व्यवस्था दिसून येते. छोट्या छोट्या




**आपण माल मागावा आणि दुकानदाराने तो तुसडेपणाने आपल्यासमोर फेकावा, बदलून मागितले तर त्याच्या कपाळावर आणखीनच दोन आढ्या पडाव्यात अशी आपली दुकानदारी बंद होऊन मॉलमधील चकचकीत व आकर्षक मालाला ग्राहकाने स्वत: स्पर्श करून पाहून, पारखून, किंमत बघून विकत घेणे शक्य होणार आहे. एकाच प्रकारचा माल दोन ग्राहकांना वेगवेगळ्या भावात मिळणे बंद होईल.**

बाजारांच्या गावांमध्ये आणि मोठ्या शहरांतील भाजी आणि धान्य मार्केटची अवस्था जर कोणी पाहिली, तर सहा दिवस शौचालय आणि सातव्या दिवशी बाजार अशी भयानक अवस्था दिसून येते. शहरांच्या भोवती सध्या सर्रास गटारीच्या पाण्यावर भाजीपाला व फळांचे उत्पादन घेण्याचा सपाटा सुरू आहे. भाजीपाला व फळे धुण्यासाठी व टिकविण्यासाठीसुद्धा घाणेरड्या पाण्याचा वापर केला जातो. यावर कुणाचाही निर्बंध नाही. ग्राहकांना याबाबतीत कोठेही ओरड करता येत नाही. सगळीकडचे बाजार सारखेच. बाजार म्हणजे घाण, असेच चित्र तयार झाले आहे!

बाजारतळावर मोकाट जनावरांचा सुळसुळाट डुकरे कुत्र्यांचा उच्छाद म्हणजेच बाजार! एकमेकांशी उच्चरवाने चाललेली घासाघीस, साध्या सरळ माणसाला भाजीची खरेदीही योग्य रीतीने जमत नाही हेच त्याचे कारण आहे. ज्याला घासाघीस (बार्गेनिंग) करणे जमते तो मात्र हुशार यावरून काही म्हणीही तयार झाल्या आहेत- 'बोलणाऱ्याचे हुलगे विकतात आणि गप्प बसणाऱ्याचे गहुही विकत नाहीत.' मालाची कुठलीही प्रतवारी नसल्याने 'बाजारात जाणारा वेडा आणि घरी बसणारा शहाणा' अशी म्हणही तयार झाली आहे.

जागतिकीकरणानंतर मोटरसायकल कशी असावी, कार कशी असावी हे भारतीय ग्राहकांना समजले. त्याचबरोबर बँक कशी असावी हे आयसीआयसी बँकेसारख्या बँकेमुळे लोकांना समजले, नसता चार चार- पाच पाच तास सहकारी बँकेत पितळी टोकन घेऊन बसावे आणि आपणच बँकेत ठेवलेले पैसे कधी मिळतात याची वाट पाहावी. राष्ट्रीयकृत बँकांतील अरेरावी सहन करावी, हे सर्व म्हणजे बँक ग्राहकानेच बँकेत पाऊल ठेवताना आपलेच पैसे असुनसुद्धा घाबरत घाबरत प्रवेश करावा, असे चित्र आपण १९९१ पर्यंत पाहत आलो. मॉल आले तर निदान किराणा दुकान कसे असते, भाजीचा बाजार कसा असतो. त्यांचेही योग्य ते मोजमाप होऊ शकते, त्यांच्या मांडणीतही काही आकर्षकपणा असतो. आपण माल मागावा आणि दुकानदाराने तो तुसडेपणाने आपल्यासमोर फेकावा, बदलून मागितले तर त्याच्या कपाळावर आणखीनच दोन आढ्या पडाव्यात अशी आपली दुकानदारी बंद होऊन मॉलमधील चकचकीत व आकर्षक मालाला ग्राहकाने स्वत: स्पर्श करून पाहून, पारखून, किंमत बघून विकत घेणे शक्य होणार आहे. एकाच प्रकारचा माल दोन ग्राहकांना वेगवेगळ्या भावात मिळणे बंद होईल. या सर्व गोष्टी घडायच्या असतील तर एफडीआयला परवानगी देणे आज जरी शक्य नसले तरी, उद्या द्यावीच लागेल. एफडीआय अशा पद्धतीने भारतीय बाजारपेठेत आले नाही तरी, भारतीय कंपन्यांच्या भागीदारीतून ते येणारच आहेत. त्याच्या भांडवलाचे प्रमाण थोडेफार कमीजास्त राहील. आजच वॉलमार्ट व्यापाऱ्यांसाठी चालवण्यात येणाऱ्या घाऊक व्यापारात उतरले असून भारतीय व्यापाऱ्यांच्या सहभागाने व्यापाऱ्यांसाठी तरी उत्तम प्रतीचा माल बाजारपेठेत उपलब्ध होणार आहे. मग आता ग्राहकांनाच किती दिवस वंचित ठेवणार?

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# विरोध कसला करता? जल्लोष करा!

अण्णा आणि टीम लोकसमर्थनाच्या नशेत तर्र झाल्याने ज्या कामासाठी आपल्याला लोकसमर्थन लाभले ते काम पूर्ण झाल्याचेही भान त्या टीमला नाही. स्वत:चे यश, स्वत:ची उपलब्धी जर अण्णा आणि त्यांच्या टीमला दिसत नसेल किंवा तिकडे त्यांना लक्ष द्यायचे नसेल तर याचा दुसरा अर्थ लोकपाल तर एक बहाणा आहे, करायचे काही वेगळे आहे असा होईल.



सुधाकर जाधव

गेल्या एप्रिल महिन्यात देशात अण्णा वादळाला आरंभ झाला. या वादळाने देशातील जागतिकीकरणातून निर्माण झालेला नव मध्यमवर्ग आणि नव श्रीमंताना आपल्या कवेत घेऊन घोंघावणे सुरू केल्याबरोबर देशाला अनेक हादरे बसले. या वादळाने आपल्याच मस्तीत मस्त असलेल्या केंद्रसरकारला पाहिला तडाखा एवढा जोरदार दिला की सरकारच लुळे-पांगळे होऊन गेले. आधीच अनिर्णयाच्या गर्तेत सापडलेल्या सरकारची निर्णयबुद्धीच अण्णावादळ स्वत:सोबत घेऊन गेले. सरकारच्या निर्णायकीचा फटका देशातील सर्वोच्च संस्था संसदेलासुद्धा बसला. स्वत:ला कायद्याचे कर्ते आणि निर्माते म्हणविणाऱ्या संसदेला अण्णा म्हणतील तो कायदा मान्य करण्यावाचून पर्याय नसल्यासारख्या स्थितीला सामोरे जावे लागले. गेल्या ४० वर्षात सनदशीर मार्गाने लोकपाल कायदा देशाला देण्यास वांझ ठरलेल्या संसदेला शेवटी अण्णा आंदोलनाच्या जबरदस्तीतून लोकपालाची गर्भधारणा झाली! एप्रिल ते डिसेंबर या बरोबर ९ महिन्याच्या शेवटी लोकपालाचा जन्म होत आहे. ४० वर्षांत जे कोणाला करता आले नाही ते अवघ्या ९ महिन्यात करून दाखविणाऱ्या अण्णा आंदोलनाला जबरदस्तीतून होत असलेले लोकपाल बालक निरोगी असेल की नाही याचीच चिंता लागून राहिली आहे. हिसार घुट्टीपासून थप्पडघुट्टीपर्यंत अनेक घुट्टी देऊनही अण्णा आंदोलनाची बाळाच्या निरोगीपणाची चिंता कायम आहे. शेवटी तर गर्भातील बाळाच्या डाव्या आणि उजव्या दंडावर बर्धन-जेटली या जोमवर्धक औषधाची सुई टोचली. एवढे सगळे प्रयत्न करूनही लोकपाल बालक कमजोर निघाले तर रामलीला मैदानात त्याचे दफन करून पुन्हा नवे बालक जन्माला घालण्यासाठी सरकार आणि संसदेला आधीच्या प्रसंगाला पुन्हा तोंड द्यावे लागेल असा सज्जड दम टीमअण्णाने देऊन ठेवला आहे! संसदेने आपल्या पसंतीचा कायदा पारित केला नाही तर २७ डिसेंबरपासून पुन्हा बेमुदत उपोषणाचा इशारा अण्णा हजारे यांनी दिला आहे. गेल्या ९ महिन्यांत उठलेल्या अण्णा वादळाने देशातील अनेक गोष्टी बदलल्या. मस्तवाल राजकारण्यांना आपण सुधारलो नाही तर संपून जाऊ याची जाणीव झाली. अजगरासारख्या नोकरशाहीला खाऊन सुस्त पडण्याचे दिवस संपत आल्याची जाणीव झाली. लोकशाहीला बटीक बनवून फायदा लाटणाऱ्यांना आता लोकशाहीचा आणखी गैरवापर झाला तर लोकशाही वाचणार नाही याचीही जाणीव झाली. ज्या अण्णा आंदोलनाने समाज मनावर, सरकारवर आणि लोकशाही संस्थांवर एवढे परिणाम करून बदलाची जाणीव करून दिली ते अण्णा आंदोलन उभे करणारे अण्णा हजारे आणि त्यांची टीमअण्णा मात्र बदलायला तयार नाहीत हेच सध्याचा घटनाक्रम दर्शवित आहे. सरकार आणि लोकशाही संस्थांनी जशी आम्ही म्हणू तीच पूर्व दिशा असे वागून लोकांची जी परवड केली तशीच लोकांची परवड अण्णा आंदोलनाकडून आम्ही म्हणू तीच पूर्व दिशा असा हट्ट संपला नाही तर होईल. अण्णा आणि टीम लोकसमर्थनाच्या नशेत तर्र झाल्याने ज्या कामासाठी आपल्याला लोकसमर्थन लाभले ते काम पूर्ण झाल्याचेही भान त्या टीमला नाही. स्वत:चे यश, स्वत:ची उपलब्धी जर अण्णा आणि त्यांच्या टीमला दिसत नसेल किंवा तिकडे त्यांना लक्ष द्यायचे नसेल तर याचा दुसरा अर्थ लोकपाल तर एक बहाणा आहे, करायचे काही वेगळे आहे असा होईल. अण्णा आंदोलनाच्या दृश्य अशा चांगल्या परिणामांसोबत एक अदृश्य असा वाईट परिणाम सर्वदूर जाणवतो आहे. देशात सगळं काही वाईटच घडत असल्याची नकारात्मक विचाराची लाट या आंदोलनाने निर्माण केली आहे. भ्रष्टाचाराने देशाचे जेवढे नुकसान केले आहे त्यापेक्षा देशाचे अधिक नुकसान या नकारात्मक लाटेने होईल. म्हणूनच अण्णा आणि त्यांच्या भक्तगणांनी तसेच गर्दीत शिरलेल्या गणंगांनीही नकारात्मक मानसिकतेतून बाहेर येऊन लोकांमध्ये आंदोलनाला लाभलेले यश अधोरेखित केले पाहिजे, असे यश अधोरेखित केले तर लोकांत आलेले नैराश्य दूर होऊन आणखी नव्या आणि मोठ्या बदलाकडे वाटचाल संभव होईल.

### अविचारी आंदोलनाचे मोठे यश

भ्रष्टाचाराच्या बाबतीत अगतिक समाजाला आक्रमक बनवून त्याविरुद्धच्या लढ्यासाठी तयार करण्याचे मोठे काम अण्णा आंदोलनाने केले हे कोणालाच नाकारता येणार नाही. आंदोलनाच्या सामाजिक आर्थिक जाणीवा क्षीण असल्याने आंदोलनाची झेप एका कायद्यापुरती मर्यादित झाली असली तरी या निमित्ताने लोकांना आपल्या शक्तीची जाणीव झाली. ही शक्ती प्रकट झाल्यानेच लोकपाल कायद्याची पहाट उगवली. ४० वर्षे जो कायदा अडगळीत पडून होता तो कायदा काही महिन्यांच्या प्रयत्नाने अस्तित्वात येतो हे या आंदोलनाचे अभूतपूर्व यश आहे. देशात अनेक महत्वाचे आणि दूरगामी बदल घडविणारे कायदे झालेत; पण लोकांच्या रेट्याने अल्पवेळात दूरगामी परिणाम करणारा हा पहिलाच कायदा तयार झाला आहे. ज्या मुद्द्यांचा समावेश करण्याचा विचार करायलाही सरकार तयार नव्हते त्या मुद्द्यांचा विचारच नाही तर स्वीकार करायला या आंदोलनाने भाग पाडले आहे. अनेक मोठमोठी आंदोलने मोठमोठ्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली दीर्घकाळ होऊनही यशापासून दूर राहिली. शेतीमालाच्या रास्त भावासाठी ३० वर्षांपूर्वी सुरू झालेले शेतकरी आंदोलन आजही त्याच मुद्द्यावर लढत आहे; पण अण्णा आंदोलनाने आपली महत्त्वाची मागणी ९ महिन्यांतच पूर्ण करून घेतली आहे. हे या आंदोलनाचे यश अभूतपूर्व असे आहे; पण आम्ही म्हणतो तसाच आणि त्याच पद्धतीचा कायदा झाला पाहिजे हा आग्रह स्वत:चे यश नाकारणारा आहे. आपण लोकशाही व्यवस्थेत आहोत आणि लोकशाही निर्णय प्रक्रियेत दुसऱ्यांच्या मताचा आदर आणि विचार करणे अभिप्रेत असते; पण टीमअण्णा लोकशाही अनुकूल अशी मानसिकता गेल्या ९ महिन्यांत कधीच दाखवू शकली नाही हीच या आंदोलनाची मोठी उणेची बाजू राहिली आहे. यशानं नम्र होण्याऐवजी अडेलतट्टूपणा वाढण्यामागे हेच कारण आहे. आपण जे सुचवितो ते भ्रष्टाचार निर्मूलनासाठी आणि दुसरे जे सुचवितात ते भ्रष्टाचाराचे रक्षण करण्यासाठी असा अहंगंड टीमअण्णात स्पष्ट दिसतो. आम्ही या कायद्याचा भरपूर विचार केला आहे इतरांनी विचार न करता किंवा त्यात बदल न करता तो संमत केला पाहिजे हा टीमअण्णाचा अविर्भाव त्यांच्यातील अहंगंडाचा परिणाम आहे. लोकांना विचार करू न देता लोकांसाठी काय भले

काय वाईट याचा विचार करणे लोकशाहीत बसत नाही. कोणताही कायदा लोक उन्मादात होतो तेव्हा होणाऱ्या परिणामांबद्दल त्यात बेपर्वाई असणे अटळ असते. लोकपालबाबतही तेच होत आहे. लोकपाल विधेयक मंजुरीच्या टप्प्यात असताना टीमअण्णांनी त्यांच्या वक्तव्यातून लोकपाल विरोधकांचा मोठा आक्षेप अप्रत्यक्षरीत्या मान्य केल्याने होत असलेल्या घाईला दुजोरा मिळाला आहे. जंतरमंतरवर नुकत्याच झालेल्या जाहीर चर्चेत एका राजकीय प्रतिनिधीने लोकपाल अंतर्गत निर्माण होणाऱ्या नोकरशाहीवर उपस्थित केलेला प्रश्न आणि या आंदोलनाचे सूत्रधार असलेले अरविंद केजरीवाल यांनी त्याला दिलेले उत्तर गंभीर प्रश्न निर्माण करणारे आहेत. त्या उत्तरांतून एक बाब स्पष्ट झाली की, केंद्रीय लोकपालच्या यंत्रणेत ३५,००० नोकरदारांचा समावेश असेल. केंद्रसरकारचे जेवढे कर्मचारी आहेत जवळपास तेवढीच प्रत्येक राज्यात राज्याच्या कर्मचाऱ्यांची संख्या आहे. म्हणजे प्रत्येक राज्यातील लोकआयुक्ताची यंत्रणासुद्धा एवढीच मोठी असेल. लोकपाल व लोकायुक्त यांच्या अंतर्गत उभी राहणारी नोकरशाही यंत्रणा लक्षात घेतली तर ज्याचे डोके ठिकाणावर आहे त्याचे डोके फिरल्याशिवाय राहणार नाही. या संदर्भातील दुसरा उपप्रश्न व त्याचे दिलेले उत्तर मोठे उद्बोधक आहे. आजच्या व्यवस्थेत एवढे प्रामाणिक कर्मचारी कोठून आणणार या प्रश्नाला उत्तर देताना केजरीवाल यांनी कबूल केले की, जोपर्यंत व्यवस्था बदलत नाही तोपर्यंत ५० सुद्धा प्रामाणिक कर्मचारी मिळणे कठीण आहे! अप्रामाणिक कर्मचाऱ्याच्या बळावर अप्रामाणिक लोकांना वठणीवर आणण्याचा अद्भूत प्रयोग करण्यास टीमअण्णा का उतावीळ आहे याचे कोडे सूटत नाही. याच्या दुसऱ्याच दिवशी अण्णांनी गाझियाबाद येथे बोलताना सगळा पैसा सरकार व त्याच्या यंत्रणेवर खर्च होत असल्याने ग्रामविकासासाठी पैसाच उरत नसल्याबद्दल संताप व्यक्त केला होता आणि तरीही या नोकरशाहीच्या डोक्यावर लोकपालची दुसरी नोकरशाही बसविण्यास अण्णा का उतावीळ आहेत हे समजणे कठीण आहे. प्रत्यक्ष लोकांच्या हाती अधिकार देणारा माहिती अधिकाराचा कायदा अनेक अर्थाने क्रांतिकारक आहे. यातील सर्वांत चांगली बाब म्हणजे वेगळी नोकरशाही निर्माण न करता या कायद्याची अंमलबजावणी परिणामकारकरीत्या झाली आहे. भ्रष्टाचार निर्मुलनासाठी हा कायदा प्रभावीपणे वापरला तर सगळा भ्रष्टाचार उघडा पडेल आणि संपेल; पण राष्ट्रीय संपत्ती न उधळता भ्रष्टाचारावर अंकूश आणू शकणारा आणि लोकशाही संरचना अधिक बळकट करणारा प्रभावी माहिती अधिकाराचा कायदा हाती असताना अनेक प्रश्न निर्माण करणाऱ्या लोकपाल कायद्याची अविचारी घाई अनाकलनीय आहे. पंतप्रधानाचा समावेश लोकपालच्या कक्षेत करणे यासारख्या ज्या ज्या तरतुदींचे दूरगामी घातक परिणाम संभवतात त्या तरतुदींवर सांगोपांग विचार झाला पाहिजे. त्याबद्दलची घाई कधीही न भरून येणारी हानी



करू शकेल. म्हणूनच जे पदरात पडतंय ते स्वीकारून जे राहून गेले त्यासाठी प्रयत्न करीत राहण्याचा सूज्ञपणा दाखविण्याची आज गरज आहे. कोणताही कायदा अंतिम नसतो. त्यात पाहिजे ते बदल करून घेता येतात ही सोय आपल्या संविधानाने करून ठेवली आहे. मूळात लोकपाल कायदा अस्तित्वात येतो आहे हीच मोठी उपलब्धी आहे. संसदेपुढे विचारार्थ कायदा हा टीमअण्णा म्हणते तेवढा ढिसाळ किंवा भ्रष्टाचाराला संरक्षण देणारा नाही. टीमअण्णाचा विश्वासघात करणारा तर अजिबात नाही.

**कसला विश्वासघात?**

अण्णा हजारे यांच्या रामलीला मैदानातील उपोषणाच्या वेळी संसदेने त्यांच्या तीन मागण्यांबद्दल जी अनुकूलता दर्शविली होती त्या बाबत सरकारने विश्वासघात केल्याचा आरोप टीमअण्णा करीत आहे. संसदेत काय घडले हे प्रत्येकाने आपल्या डोळ्याने पाहिले आहे. त्याचे स्मरण करून पाहिले तर टीमअण्णाच्या आरोपात काहीच तथ्य व दम नसल्याचे स्पष्ट होईल. पंतप्रधानांच्या पत्रात ठरावाचा उल्लेख असला तरी तो निव्वळ अण्णांची समजूत काढण्याचा प्रकार होता. टीमअण्णाला याची पूर्ण कल्पना होती की संसदेने असा कोणताही ठराव केलेला नाही. संसदेची या तीन मुद्द्यांबद्दलची सकारात्मक भावना आपल्या भाषणातून प्रणव मुखर्जी यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली आणि या भावनेचा स्थायी समितीने विचार करावा असे त्यांनी सांगितल्यावर संसदेची बैठक संपली होती. स्थायी समितीने तसा विचार केला व लोकआयुक्त संबंधीची मोठी मागणी स्वीकारली. सिटीझन चार्टर लागू करण्यात येईल हे आश्वासनही पाळण्यात आले आहे. त्याचा लोकपाल अंतर्गत समावेश नाही इतकेच. तसा समावेश करण्याचे आश्वासन कधीच देण्यात आले नव्हते. नोकरशाहीला अजिबात मोकाट सोडलेले नाही. खालची नोकरशाही ही काही सत्ताधाऱ्यांची नातलग किंवा सोयरी नाहीत. त्यांना लोकपाल कक्षेत न आणण्याचा विचार हा लोकपाल यंत्रणा अजस्त्र, अगडबंब व अतिखर्चिक होऊ नये यासाठी होता हे समजून घेतले पाहिजे; पण दुर्दैवाने अण्णा आंदोलनाने विवेकाने विचार करण्याची सवयच मोडीत काढल्याने चांगल्या बाबींचाही स्वीकार करण्याची मानसिकता राहिली नाही. एकाच संस्थेच्या हातात सर्व शक्ती केंद्रीत न होणे हे लोकशाहीच्या अस्तित्वासाठी आणि संवर्धनासाठी आवश्यक आहे; पण टीमअण्णाचा दुराग्रह अशी शक्तीकेंद्रीत करण्यावर असल्याने त्यांच्या लोकशाहीविषयक आस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. संसदेसमोरील लोकपाल विधेयकाने अण्णा आंदोलनाच्या प्रत्येक शब्दाचा स्वीकार केला नसला तरी भावनेचा पूर्णतः स्वीकार व आदर केला आहे हे मान्य करायला अडचण असू नये.. या लोकपाल कायद्यात अनेक त्रूटी राहून गेल्या असतील, कायदा अंमलात आणताना आणखी नव्या त्रूटीही लक्षात येतील व त्या दुरुस्तही करता येतील; पण जो कायदा होतो आहे त्यात संसदेने लोकभावनेचा आदर केला आहे आणि खऱ्या अर्थाने लोकांचा विजय झाला आहे हा संदेश लोकापर्यंत जाणे आजच्या घडीला गरजेचे आहे; पण विश्वासघाताचे ढोल बडवून लोकांत नव्याने उन्माद निर्माण करण्याचा प्रयत्न होणार असेल तर टीमअण्णाच लोकांच्या विश्वासाचा गैरफायदा घेत असल्याचा निष्कर्ष निघेल. असा निष्कर्ष चुकीचा ठरवायचा असेल तर अण्णा आणि त्यांच्या टीमने नव्याने आंदोलनाची चिथावणी देण्याऐवजी लोकपाल कायदा मार्गी लागल्याबद्दल लोकांना विजयोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले पाहिजे. अण्णा आंदोलना सोबत कोण आणि किती लोक आहेत हे महाराष्ट्रात सव्वाशेच्यावरील नगर परिषदांच्या निवडणुकांनी दाखवून दिल्याने असा विजयोत्सव साजरा करणे अण्णा आंदोलनाचे मनोधैर्य व बळ वाढविण्यासाठीसुद्धा गरजेचे आहे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# शेतीप्रश्नांची क्रूर थट्टा!

वस्त्रोद्योग अडचणीत येऊ नये म्हणून कापसाचे देशांतर्गत भाव अशा कृत्रिमरीतीने किमान पातळीवर ठेवणे ही तर चेष्टेच्या क्रूरतेची सीमा झाली. इतर राज्यांमध्ये अशी आंदोलने झाली नाहीत म्हणून महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना काही मदत करता येत नाही हाही दावा क्रूरच समजला पाहिजे. आपल्या अन्यायाप्रती सजग असलेला व त्याची नेमकी फोड करून मागण्या करणारा महाराष्ट्रातील शेतकरी नतद्रष्ट असावा असाही सरकारचा समज असल्याचे स्पष्ट होते.



गिरधर पाटील

एखाद्याला एखादा प्रश्न गंभीरतेने घेता येत नसेल तर त्याने किमानपक्षी त्या प्रश्नाची थट्टा करू नये अशी अपेक्षा बाळगली जाते. शेतीचा एक प्रश्न नव्हे तर सारी शेतीच गंभीरतेने घेता येत नसताना तिची साधी थट्टा नव्हे तर क्रूर म्हणता येईल अशी थट्टा सत्ताधारीच नव्हे तर सत्तेच्या स्पर्धेत असणाऱ्या साऱ्या राजकीय पक्षांनी चालवलेली आहे. या मार्गाने वा पद्धतीने या प्रश्नांची सोडवणूक होईल असे वाटणारे भाबडे शेतकरी बरेचसे असल्याने व माध्यमांच्या काहीतरी नवे द्यावे लागणाऱ्या अपरिहार्यतेमुळे आंदोलनांचे वातावरण जिवंत ठेवण्याच्या या प्रक्रियेतून काहीतरी केल्याच्या भावनेशिवाय दुसरे काही निष्पन्न होत नसल्याचे दिसते आहे.

शेतीतल्या प्रश्नांवर शेतकऱ्यांनी आंदोलन करणे स्वाभाविक आहे. या असंतोषाचा फायदा घेण्याची ही राजकीय पर्वणी साधणारे विरोधी पक्षही काही प्रमाणात क्षम्य ठरतात; परंतु अलिकडच्या काळात एक नवीनच प्रकार उदयास आलेला दिसतो. ज्यांनी या प्रश्नांची सोडवणूक करायची ते सत्ताधारी पक्षही शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत अशी आंदोलने करायला लागलीत, की अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना लाज वाटावी. मागच्या कांदाभावाच्या आंदोलनात ज्यांनी निर्यातबंदी लादली तेच आंदोलनात धाय मोकलून रडायला लागले. ज्यांनी हमी भावाने खरेदी करायचे ते नाफेडचे पदाधिकारी सरकारविरोधात दुगाण्या झाडू लागले. आताच्या कापूस आंदोलनात ज्यांनी हमी भाव वाढवून द्यायचा तेच एकाच पक्षाची सत्ता असलेल्या राज्यकेंद्राचा खेळ खेळण्यात मग्न आहेत. नाफेड तर ३३०० खाली भाव आल्यावर आम्ही खरेदीला उतरू असे कोडगेपणाने जाहीर करते आहे. जीव असेपर्यंत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लढण्याची तयारी ठेवणाऱ्या यांच्यापैकी एकानेही आपल्या पक्षाच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध म्हणून आपल्या पदाचा राजीनामा दिला नाही हे विशेष!

शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे राजकियीकरण झाल्याने त्यातून मार्ग काढण्यासाठी जे काही आर्थिक निर्णय व धोरणात्मक बदल करावयाचे असतात त्यांच्याकडे दुर्लक्ष होऊन तात्पुरत्या मलमपट्ट्या करण्याचाच साऱ्यांचा प्रयत्न असतो. कांदा, ऊस व आता कापूस यांच्या भाववाढीचा प्रश्न आताच निर्माण झालेला नाही. दरवर्षी आकड्यांचा थोडाफार तपशील वगळता त्याच मागण्या, त्याच उपाययोजना पुढे येऊनसुध्दा यावर मूलगामी निर्णय न घेतल्याने नेमेची येतो पावसाळा यानुसार ही सारी आंदोलने आळीपाळीने येत असतात. या साऱ्या समस्येचे मूळ शेतमालाच्या बाजाराच्या विकृतीकरणात आहे आणि तेथे काही बदल वा सुधारणा केल्याशिवाय शेतकऱ्यांच्या पदरात काही पडणार नसल्याने या साऱ्या आंदोलनांना आपली दिशा व मार्ग ठरवावा लागणार आहे.

आताशी कापूसभावाचा प्रश्नही अशाच क्लिष्टतेपर्यंत पोहोचला आहे. मुळात ही कोंडी दिवसेंदिवस गंभीर होत सर्वमान्य तोडग्याच्या आशा मावळल्या की काहीतरी थातूरमातूर पर्याय स्वीकारण्यावाचून शेतकऱ्यांना फारसा पर्याय राहत नाही. यातील सामील राजकीय पक्ष दुसऱ्या कुठल्या प्रश्नांना हाती घेऊन रस्त्यावर आपली राजकीय वाटचाल सुरू ठेवतात, शेतकऱ्यांचे प्रश्न मात्र जसेच्या तसे राहत पुढच्या वर्षीच्या आंदोलनाच्या प्रतिक्षेत राहतात.

मागच्या वर्षी कापूस ६ ते ७ हजारांच्या आसपास विकला गेला असताना सरकारने मात्र ३३०० रुपये आधारभूत जाहीर करावा हा सरकारचा खोडसाळपणाच नव्हे तर शेतकऱ्यांच्या प्रचंड आर्थिक नुकसानीला कारणीभूत ठरणारा आहे. भारतीय शेतकऱ्यांची उत्पादकता व आताशा बाजारात कापसाला भाव नसल्याचे सांगितले जाते तेही फारसे संयुक्तिक नसल्याचे दिसते. जागतिक बाजारपेठेतील बव्हंशी व्यवहार हे वायदे व्यापारानुसार होतात व कुठल्या देशात काय उत्पादन काय मात्रेत होणार याची अचूक व अद्ययावत माहिती या बाजाराकडे असल्याने त्याचे प्रतिबिंब या तेजीमंदीच्या चक्रांमध्ये पडणे स्वाभाविक आहे. भारतीय शेतमाल बाजारात यायच्या वेळीच नेमके हे सारे कसे घडते याचा अभ्यास सरकारने करणे आवश्यक असताना सरकारही या शोषण व्यवस्थेच्याच हातचे बाहुले बनून आपल्या वैधानिक जबाबदारीची पायमल्ली करते आहे.

वस्त्रोद्योग अडचणीत येऊ नये म्हणून कापसाचे देशांतर्गत भाव अशा कृत्रिमरीतीने किमान पातळीवर ठेवणे ही तर चेष्टेच्या क्रूरतेची सीमा झाली. इतर राज्यांमध्ये अशी आंदोलने झाली नाहीत म्हणून महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना काही मदत करता येत नाही हाही दावा क्रूरच समजला पाहिजे. आपल्या अन्यायाप्रती सजग असलेला व त्याची नेमकी फोड करून मागण्या करणारा महाराष्ट्रातील शेतकरी नतद्रष्ट असावा असाही सरकारचा समज असल्याचे स्पष्ट होते. आपल्या व्यवसायासाठी लागणारा कच्चा माल काय भावाने कुठून घ्यावा हा त्या उद्योगाचा प्रश्न आहे. सरकारला जर त्या घटकाला मदत करायची असली तर तो निर्णय सरकारचा असावा, त्यासाठी शेतकऱ्याचा बळी द्यायची काही एक आवश्यकता नाही. मात्र या साऱ्या प्रकारात शेतकऱ्यांचे प्रातिनिधित्व करणारे सरकारमधील घटक कमी पडल्याचे दिसते आहे.

या साऱ्या विवेचनावरून लक्षात येईल, की या समस्येचा संघर्षबिंदू हा राजकीय आखाड्यात तोही पक्षीय राजकारणाशी संबंधित नसून शेतकऱ्यांना बाजार स्वातंत्र्य देऊ शकणाऱ्या व्यवस्थेचा आहे. सत्तेवर कुठला पक्ष येतो यापेक्षा कुणाला हा प्रश्न खरोखर समजला आहे व त्यावर योग्य तो निर्णय घेण्याची इच्छाशक्ती आहे की नाही याच्याशी निगडीत आहे. देशातील एक मोठी लोकसंख्या अशा रीतीने त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवणे व त्यांच्या रास्त मागण्यांची आंदोलने मेटाकुटीला आणून ते मोडण्यात धन्यता मानणारे राज्यकर्ते जोवर सक्रीय आहेत तोवर शेतकऱ्यांच्या उद्धाराची काही एक शक्यता दिसत नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबद्दल सजग असणाऱ्या साऱ्या घटकांनी केवळ बाजार सुधारांवर जरी लक्ष्य केंद्रीत केले तरी पुरेसे आहे. भारतीय लोकसंख्येतील शेतकऱ्यांचे प्रमाण लक्षात घेता आकड्यांवर आधारलेल्या लोकशाहीत खरे म्हणजे आपली धोरणे राबवून घेणे फारसे कठीण ठरू नये. ज्याचे जळते त्या शेतकऱ्याला हे सारे कधी समजेल हा मात्र कळीचा मुद्दा आहे!!

**डॉ. गिरधर पाटील**
http://girdhar-liberals.blogspot.com
girdhar.patil@gmail.com

■■

# नागपूर शेतकरी प्रतिविधानसभा वृत्तांत




**प्रतिविधानसभा - अध्यक्ष, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ**

नागपूर येथील रामनगर मैदानावर दि. १० व ११ डिसेंबर रोजी शेतकरी संघटनेद्वारा प्रतिविधानसभा आयोजित करण्यात आली होती. या प्रतिविधानसभेच्या पहिल्या दिवसाच्या कामकाजात राज्यातील शेतकऱ्यांना वीजबिलाची ९ हजार कोटींची थकबाकी माफ करण्यात आली. याशिवाय, शेतमालाचा उत्पादन खर्च भरून निघणार नाही, असेच हमी भाव देण्याचे धोरण आजवर शासनाने राबविले असल्याने शेतकऱ्यांवरील सर्व कर्जे अनैतिक आहेत हे लक्षात घेऊन शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जातून कर्जमुक्त करण्याचे संकेत देण्यात आले. केंद्रसरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राज्य सरकारने सुचविलेली कुठलीही मागणी मान्य करीत नसल्याने सभागृहाने केंद्राचा निषेधाचा ठराव पारित करीत, प्रसंगी दिलेला पाठिंबाही मागे घेण्याचा इशारा देण्यात आला.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अवघे राज्य ढवळून निघत असताना उपराजधानीतील हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येच्या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेने प्रतिविधानसभेचे आयोजन केले होते. रामनगर मैदानावर दिवसभर सभागृहाचे कामकाज चालले. माजी आमदार सरोज काशीकर यांची विधानसभेचे प्रतिअध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. प्रतिमुख्यमंत्री म्हणून ॲड. वामनराव चटप यांनी तर प्रतिउपमुख्यमंत्री म्हणून श्री. रवि देवांग यांनी भूमिका बजावली.

### प्रथम सत्र

प्रारंभी प्रतिअध्यक्षा सरोज काशीकर यांनी ध्वजारोहण केले. १० डिसेंबर १९८६ च्या सुरेगाव येथील गोळीबारात शहीद झालेल्या तसेच आजवर वेगवेगळ्या शेतकरी आंदोलनांतील हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आल्यानंतर कामकाजाला रीतसर सुरूवात झाली. मा. प्रतिमुख्यमंत्र्यांनी त्यांच्या मंडळातील सर्व प्रतिमंत्र्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर प्रश्नोत्तराने सभागृहाच्या कामकाजास सुरुवात झाली. प्रश्नावलीतील दहाही प्रश्न कृषी, वीज, सार्वजनिक बांधकाम विभाग, शालेय व उच्चशिक्षण, सार्वजनिक आरोग्य, गृहविभाग, नगरविकास, विधी व न्याय या खात्याशी संबंधित होते. प्रश्नोत्तराच्या प्रारंभी प्रतिविरोधी पक्षनेते राम नेवले यांनी शेतकऱ्यांच्या शेतमाल व उत्पादन खर्चासंबंधी प्रश्न विचारून सरकारची परीक्षा घेतली. हेमंत ठाकरे यांनी कापसाच्या आधारभावाबाबत व्यापाऱ्यांकडून होत असलेली लूट तसेच सरकारच्या याबाबतच्या बोटचेपे धोरणाबद्दल नाराजी व्यक्त केली. देवीप्रसाद ढोबळे यांनी शेतकऱ्यांच्या वीजबिल माफीची मागणी केली. भारनियमन आणि वीजसंकटावर सरकारला दोषी धरले. अनिल चव्हाण यांनी ऊस उत्पादकांना भाव न देणाऱ्या कारखानदारांवर टीकेची झोड उठविली.

प्रतिमुख्यमंत्र्यांनी आधारभूत किमतीपेक्षाही कमी दर देणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्याचा इशारा देत पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याचे संकेत दिले. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांना तुरुंगात टाकण्याचे आश्वासन सभागृहाला दिले. प्रतिउपमुख्यमंत्री व कृषिमंत्री रवी देवांग यांनी निर्यात धोरण नेहमीच खुले असावे असे मान्य करीत, केंद्राकडे बोट दाखवत महागाईच्या नावावर केंद्र सरकार शेतकरी विरोधी धोरणे राबवत असल्याची टीका केली. चर्चेमध्ये देवीप्रसाद ढोबळे, अनिल चव्हाण, शरद गदरे, विष्णू वानखेडे, जी.पी.कदम, सतीश दाणी, संतोष तांदळे, शेख रशीद, दिलीप भोयर, बाबुराव हाडोळे, मुरलीधर ठाकरे, निवृत्ती शेवाळे, माणिक कांबळे, तुळशीराम कोठेकर, भगवान शिंदे, निळकंठ घवघवे, गजानन भांडवले, शिवाजी राजोळे, विक्रम शेळके, सुनिल शेरेवार, जीवन गुरनुले, धोंडिबा पवार, गजानन बंगाळे, बैजीनाथ ढोरकुले, अण्णाजी राजेघर, ज्ञानेश्वर गादे, किशोर ढगे, घनश्याम पुरोहीत, जालिंदर देशमुख, उल्हास कोटमकर, जयंत बापट, सौ. रेखा हरणे, अजय बसेर, जे.डी.देशमुख, प्रभाकर माळवे, सुरेश आगलावे, गुलाबसिंह रघुवंशी, प्रवीण देशमुख यांनी भाग घेतला तर गुणवंत पाटील हंगरगेकर, ललित बहाळे, रवी देवांग, वामनराव चटप यांनी चर्चेला उत्तर दिले.

प्रतिवस्त्रोद्योग व पणनमंत्री विजय नवल यांनी कापूस उत्पादकांना प्रति क्विंटल २००० रुपये अनुदान देण्याची घोषणा करताच सभागृहात गदारोळ झाला. भीक नको, घामाचे दाम हवे, अशी मागणी केली. यात हस्तक्षेप करीत मुख्यमंत्र्यांनी हे अनुदान नसून आजवर शासनकर्त्यांनी केलेल्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून शेतकऱ्यांना सन्मानजनक मदत देत असल्याची घोषणा करीत वादावर पडदा टाकला. त्यासोबतच कापसाला ६ हजार रुपये, सोयाबिनला ३००० रुपये, धानाला २६०० रुपये व तुरीला ५००० रुपये प्रतिक्विंटल हमीभाव जाहीर करण्याची शिफारस केंद्राकडे लावून धरण्यात येईल, अशी ग्वाहीही दिली. प्रतिऊर्जामंत्री मधुसूदन हरणे यांनी आजवर शासनाकडून अनेक चुका झाल्याचे सभागृहात कबूल केले. प्रतिसहकार मंत्री अनिल घनवट यांनी सहकारी लॉबीवर नाराजी व्यक्त करीत प्रसंगी शेतकऱ्यांचे पैसे हडपणाऱ्या कारखान्यांचे संचालक मंडळ बरखास्त करण्याचा इशारा दिला.

प्रश्नोत्तरानंतर लक्षवेधी झाल्या. शेतकरी वीजबिल भरू शकत नाहीत. भारनियमनाचा नेहमीचाच विषय आहे. शेतमालाला भाव नाही, उलटपक्षी कर्जाचा

डोंगर आहे. ही परिस्थिती उद्भवण्याला शासन आणि वीज नियामक मंडळातील अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार कारणीभूत आहे, याकडे लक्ष वेधत प्रतिऊर्जामंत्री मधुसूदन हरणे यांनी १५ दिवसांत अधिकाऱ्यांनी संपत्ती जाहीर करावी, असे निर्देश देत, असे न केल्यास आयकर विभागाकडून छापे टाकण्यात येतील व थकबाकीच्या मुक्तीपोटी येणारे तुट भरून काढण्यासाठी अधिकाऱ्यांची संपत्ती जप्त करण्यात येईल, असा इशारा दिला. त्यानंतर दिवसभर अशासकीय विधेयकावर चर्चा होऊन दिवसभराचे कामकाज करण्यात आले.

### द्वितीय सत्र

रामनगर येथील मैदानात प्रतिविधानसभेच्या दुसऱ्या दिवशी अशासकीय विधेयकाच्या स्वरुपात स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी करणारा प्रस्ताव राजकुमार तिरपुडे यांनी मांडला. नागपूर करारानुसार दीड महिना हिवाळी अधिवेशनाचा काळ असावा असे ठरले असताना अधिवेशन ८ ते १० दिवसांवर आले आहे. विदर्भाचा सिंचन, रस्ते, पाणी, शिक्षण, उच्च तंत्रज्ञान, सामाजिक न्याय वीज, कर्जे याबाबतचा अनुशेष वाढत आहे. विदर्भाला प्रगत करण्यासाठी केलेले प्रयत्न अपुरे असून, विदर्भातील जनतेचे स्थलांतर, आदिवासींचे कुपोषण, पुरेसा कच्चा माल असता नक्षलग्रस्त जिल्ह्यात निर्माण न झालेले उद्योग, वाढती बेरोजगारी, वाढता नक्षलवाद यामुळे ११ जिल्ह्यांचे विदर्भ राज्य झाले पाहिजे, अशी मागणी श्री. तिरपुडे यांनी केली. स्वतंत्र विदर्भ राज्याच्या अशासकीय विधेयकावरील डॉ. गोविंद वर्मा, तन्हा नागपुरी, दिगंबर अकर्ते, शेषराव आटोणे, शेरखान पठाण, विक्रम शेळके, अहमद कादर, गुणवंत नागपुरे, ओमप्रकाश तापडिया, शेख बशीर, धनंजय धार्मिक, अहमद कादर, ओमप्रकाश तापडिया, राम नेवले यांनी चर्चेत भाग घेतला. उपमुख्यमंत्री रवी देवांग यांनी विधेयकासंदर्भात निवेदन करताना वेगळा विदर्भ राज्याची मागणी मान्य केली आणि विधानसभेत हा ठाराव एकमताने मंजूर करण्यात आला. दरम्यान, 'ये तो अंगडाई है, आगे घोर लडाई है' असा नारा देत ॲड. वामनराव चटप यांनी पुढील आंदोलनासाठी सज्ज राहण्याचे आवाहन शेतकऱ्यांना केले. प्रश्नोत्तराच्या तासात सौ. सिंधुताई इखार, सचीन डाफे, सौ. संध्या राऊत यांनी भाग घेतला.

राज्यातील ढासळत्या आर्थिक स्थितीविषयी तसेच तरुणांना रोजगार मिळावा या हेतूने करावयाची उपाययोजना यावर डॉ. गोविंद वर्मा, उत्तमराव बाभळे यांनी अशासकीय विधेयके मांडली. विष्णूजी वानखेडे यांनी रखडलेले सिंचन प्रकल्प, टोलनाके, ग्रामीण भागातील सोयी-सुविधा, कालबाह्य कायद्यांची छाटणी, आरोग्यसेवेतील रीक्त पदे यावर चर्चा केली. वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यात नगरपरिषद निवडणुकीदरम्यान पकडण्यात आलेल्या दारूसंदर्भात लक्षवेधी उपस्थित करण्यात येऊन त्यावर गंभीर चर्चा झाली. याशिवाय ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षण, शिक्षणाचा दर्जा, शिक्षकांवर सोपविण्यात आलेली शिक्षणबाह्य कामे या विषयीची लक्षवेधी चांगलीच गाजली. यावर शिक्षणमंत्री डॉ. आप्पासाहेब कदम यांनी शिक्षकांना अशैक्षणिक कामातून मुक्त करण्याचे आश्वासन दिले. ग्रामीण भागातील रस्ते, वीज व्यवस्थेत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. पथकर रद्द करण्यात यावा, आदिवासींच्या विकासासाठी अर्थसंकल्पात निश्चित तरतूद करण्यात यावी, या मागण्याही मान्य करण्यात आल्या.

### एफडीआयला पाठिंबा

अर्धा तास या सदराखाली परकीय थेट गुंतवणुकीला पाठिंबा देणारा ठराव मांडण्यात आला. यावरील चर्चेत विनय हर्डीकर, शशिकांत भदाने सर, बाबुराव हाडोळे यांनी भाग घेतला. हा ठराव आवाजी मतदानाने पारीत करण्यात आला. थेट परकीय गुंतवणुकीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांना अधिक भाव मिळेल, त्याचप्रमाणे ग्राहकांनासुद्धा गुणवत्तापूर्ण वस्तू मिळेल, असे या ठरावात म्हटले आहे.

### रामगिरीवर शेतकऱ्यांची चढाई

प्रतिविधानसभेची सांगता झाल्यानंतर प्रतिविधानसभेत मंजूर झालेले ठराव सादर करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी वेळ मागितली होती; परंतु मुख्यमंत्री

### प्रति विधानसभा मंत्रीमंडळ

| | |
|---|---|
| सौ. सरोजताई काशीकर .................... | अध्यक्ष |
| श्री. प्रभाकर दिवे.......................... | उपाध्यक्ष |
| ॲड. वामनराव चटप....................... | मुख्यमंत्री |
| श्री. रविभाऊ देवांग ........................ | उपमुख्यमंत्री (कृषी) |
| श्री. गुणवंत पाटील हंगरगेकर .............. | गृह |
| ॲड. दिनेश शर्मा........................... | सांसदीय कामकाज |
| श्री. ललित बहाळे.......................... | अर्थ |
| ॲड. अनंत उमरीकर ....................... | विधी व न्याय |
| श्री. कैलास तवार .......................... | महसूल |
| श्री. पुरुषोत्तम लाहोटी...................... | सार्वजनिक बांधकाम |
| श्री. समाधान कणखर...................... | ग्रामविकास |
| श्री. मधुसूदन हरणे ........................ | ऊर्जा |
| डॉ. आप्पासाहेब कदम ..................... | शिक्षण |
| श्री. नंदकिशोर काळे ....................... | समाजकल्याण |
| श्री. अजित नरदे ........................... | उद्योग |
| श्री. अनिल घनवट.......................... | सहकार |
| श्री. विजय निवल........................... | वस्त्रोद्योग व पणन |
| श्री. राजेंद्रसिंह ठाकूर........................ | अदिवासी विकास |
| श्री. अरुण केदार........................... | सिंचन |
| श्री. जगदीश बोंडे.......................... | नगरविकास |
| श्री. भाष्कर महाजन........................ | आरोग्य |
| सौ. शैलजा देशपांडे......................... | महिला,बालकल्याण |
| श्री. जयकिरण गावंडे ...................... | क्रिडा व युवककल्याण |
| श्री. नितीन देशमुख ........................ | दुग्ध व्यवसाय |
| श्री. विनय हर्डीकर ......................... | उच्चशिक्षण व तंत्रज्ञान |
| श्री. दगडू एकनाथ शेळके.................. | अन्न व नागरी |
| श्री. ब. ल. तामसकर ...................... | रोजगार हमी |
| श्री. विजय विल्हेकर ....................... | सांस्कृतिक |
| श्री. राम नेवले ............................. | विरोधी पक्षनेता |
| सौ. अंजली पातूरकर....................... | तालिका सभापती |
| श्री. उत्तमराव वाबळे....................... | तालिका सभापती |
| श्री. ओमप्रकाश तापडिया .................. | तालिका सभापती |
| श्री. गंगाधर मुटे........................... | मुख्य सचिव |



प्रतिविधानसभेस उपस्थित सन्माननीय आमदार मंडळी



रामगिरीसमोर ठिय्या देऊन बसलेले शेतकरी कार्यकर्ते



मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेची आंदोलकांना माहिती आणि पुढील रणनीतिची घोषणा करताना शेतकरी संघटनेचे अध्यक्ष मा. रवी देवांग



पोलिस लाठीमारात जखमी झालेले शेतकरी पुंडलिक ठाकरे यांना उपचारासाठी हलविताना शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते



**मुख्यमंत्री मा. पृथ्वीराज चव्हाण यांच्याशी चर्चा करताना शेतकरी संघटनेचे शिष्टमंडळ**

कार्यालयाने भेटीची परवानगी नाकारल्यामुळे शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना भेटून निवेदन देण्याचा प्रस्ताव रवि देवांग यांनी मांडताच उपस्थितांनी हात उंचावून जबरदस्त घोषणा त्या प्रस्तावाचे अनुमोदन केले. सायंकाळी ४ वाजता प्रतिविधानसभेतील ठराव मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी या निवासस्थानी पोहचवून देण्यासाठी मिरवणूक काढण्यात आली. प्रतिविधानसभेचे मुख्यमंत्री माजी आमदार वामनराव चटप यांच्या नेतृत्वात दोन हजार शेतकरी रामगिरीकडे रवाना झाले. शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते घोषणा देत पाठोपाठ मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाकडे निघाले. पोलिसांनी त्यांना लेडीज क्लबजवळ थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याशिवाय न परतण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केल्याने ते पोलिसांच्या सुरक्षेला भेदत रामगिरीकडे गेले. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी अतिरिक्त कुमक बोलाविली. तात्काळ पोलिसांचा ताफा तेथे पोहोचला. वनभवन परिसरात शेतकऱ्यांना पुन्हा अडविण्यात आले. शेतकरी रामगिरीकडे जाण्याचा प्रयत्न करू लागले. ते संतापले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. तणाव निर्माण झाला. पोलिसांनी केलेल्या लाठीमारात यवतमाळ जिल्ह्यातील पुंडलिकराव ठाकरे (६५) रा. आष्टोना, ता. राळेगाव या शेतकऱ्याच्या डोक्यावर लाठीचा प्रहार झाल्याने मुर्च्छितावस्थेत त्यांना मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## लाठीमार

पोलिसांनी सौम्य बळाचा वापर केला; परंतु कार्यकर्त्यांनी या पोलिसी बळाला न जुमानता पोलिस जिमखाना क्लबकडे आगेकूच चालूच ठेवली. रामगिरी या मुख्यमंत्र्याच्या निवासस्थानापासून केवळ हाकेच्या अंतरावर मिरवणूक पोचल्यावर पोलिसांना मिरवणूक अडविण्यात यश मिळाले. या स्थानापर्यंत आजवर कोणतीही मिरवणूक अथवा मोर्चा पोचलेला नाही, असे सांगण्यात येते. मात्र मुख्यमंत्र्यांनी शेतकरी संघटनेच्या शिष्टमंडळाला भेटीसाठी पाचारण केल्यानंतर कार्यकर्ते शांत झाले.

## मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची भेट

माजी आमदार वामनराव चटप यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेतली. यावेळी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रवि देवांग, गुणवंत पाटील, अनिल घनवट, राम नेवले, शैला देशपांडे, कैलास तवार, अरुण केदार, मधुसुदन हरणे, गंगाधर मुटे आदी उपस्थित होते. शेतकरी संघटनेने प्रतिअधिवेशना मंजूर झालेल्या ठरावाची प्रत मुख्यमंत्र्यांना सादर केली. कापसाला प्रति क्विंटल सहा हजार रुपये भाव देण्यात यावा, विजेचे भारनियमन बंद करावे, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे, या मागण्यांचा यात समावेश आहे. भेटीच्या प्रारंभीच शेतकरी संघटनेने एफडीआयला समर्थन दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी शेतकरी संघटनेचे आभार मानले. कोणत्याही शेतमालास निर्यातबंदी न लावण्याच्या शेतकरी संघटनेच्या भूमिकेचे मुख्यमंत्र्यांनी समर्थन केले. मात्र क्विंटल मागे न देता कापूस, सोयाबिन व धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिएकरी मदत देण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. मात्र यावर शिष्टमंडळाने असहमती दर्शवली आणि गरज भासल्यास संघटना पुन्हा रस्त्यावर उतरेल, असा मुख्यमंत्र्यांना इशारा देण्यात आला.

■■